म. ग्रं. सं. ठाणें
विषय ८३/८२१
सं. नं. ९०४

# ध्रुवावरील फुलें.

REFBK-0001181
REFBK-0001181

सं.काव्य ३६२

११८९

# ध्रुवावरील फुलें.

कवि—श्रीयुत माधव.

( Born, 1892. )

Self-sown my stately garden grows;
  The winds and wind-blown seed,
Cold April rain and colder snows
  My hedges plant and feed.

—*Henry David Thoreau.*

REFBK-0001181


डिसेंबर, १९१५.

मुद्रक व प्रकाशक,

बाळकृष्ण रावजी पालवणकर.

"खेळगडी प्रिंटिंग वर्क्स" घर नं. १३५।१३७

गिरगांव, बॅकरोड-मुंबई.



“ लोक-निंदेची वाटुं नये खंती,
तुला यश बा ! मी सर्वकाळ चिंतीं;
तुझीं काव्यें येतील प्रसिद्धीसी,
तदा टीकेला पात्र तूंहि होसी !

परी टीकेनें कष्टि न तूं होई,
धैर्य धरुनी रत उद्यमींच राहीं.
कवी होशिल तूं सुप्रसिद्ध, कालें,
तुझ्या समयीं दिसतील इतर, बालें !

कवि-श्रेष्ठ अशी कीर्ति तुझी होवो !
शुक्ल इंदुपरी वृद्धितेंहि पावो !
तुला, अस्तगंत शत्रु, बघुनि होवो !
तुझें इच्छित वाग्देवि तुला देवो !

-रा. गोपाळराव पाटणकर,
( साखरी आगर. ) स० १९११

# प्रकाशकांचें हृद्गत !

छबुलें रडुं लागलें ह्मणजे त्याचीं मातापितरें व भावंडें, मंजुळ गाणीं गाऊन त्याचें मन रिझवितात आणि तेंहि विचारें मोहित होऊन रडायचें थांबतें! गारुड्याच्या पुंगींतून निघणारे काव्यालाप ऐकून सापासारखा प्राणीही क्षण-भर आनंदानें डुलूं लागतो ! शाहीराचीं कडवीं ऐकून हताश झालेला योद्धा आपली समशेर खरकन् म्यानावेगळी करून शत्रूचा घोट घ्यावयाला तयार होतो ! अगदीं दुष्ट मनोवृत्तींच्या माणसालाही काव्य-करुणालाप ऐकून रडें आल्याशिवाय रहात नाहीं ! आणि दुःखानें होरपळून गेलेलें अंतःकरण पूर्ण-पणें समाधानवृत्तींत आणण्यास काव्याचा जितका उपयोग होतो तितका दुसरा कशाचाहि होत नाहीं ! हा आजचाच अनुभव आहे असें नव्हे, तर फार प्राचीन कालापासूनचा आहे. महाभारतासारखे जे काव्यग्रंथ आज जगाच्या पाठीवर सर्वमान्यता पावले आहेत व ज्यांचा उपयोग प्राचीन व अर्वाचीन मानव जातीस सर्वकालीं सारखा होत आहे, त्या काव्यग्रंथाची थोरवी जितकी गावी तितकी थोडीच !

वरील विवेचनावरून इतकें सिद्ध होतें कीं, काव्य ही एक अजब शक्ति असून ती निर्माण करण्यांत परमेश्वरानें प्राणीमात्रांवर महदुपकार केलेले आहेत. मनुष्याच्या मनावर इष्ट ते संस्कार घडविणारी शक्ति बलवान् व निरुपद्रवी असावी लागते आणि ती काव्यांत आहे. कोणत्याही परिस्थितींत आनंदानें कालाचा व्यय करविणारा काव्यासारखा दुसरा कोणीही सोबती नाहीं ! आनंदानें वेळ घालवित असतां चटकन् आपण आपल्या तोंडून एखादें गाणें गुणगुणतों आणि दुःखानें होरपळत असतांहि शेजारच्या बाल-गंधर्वानें ह्मटलेलें गाणें ऐकण्याकडे आपली प्रवृत्ती होते. यावरूनही काव्य-लालसेची शक्ति प्राणीमात्रांत ठेवण्यांत परमेश्वराची कांहीं तरी गूढ योजना असली पाहिजे !

गाणें ऐकून आपलें मन रमलें; तर मग जो प्राणी काव्य निर्माण करितो, त्याच्या अंतःकरणाची स्थिति कशा प्रकारची असेल; याची यथार्थ कल्पना ‘ जावें त्याच्या वंशा ’ तेव्हांच कळणार ! व्यवहारांत अशा काव्य प्रसवणाऱ्या माणसांना आह्मीं “ खुळे ” अशी संज्ञा देतों ! परंतु वस्तुस्थिति तशी नसते

" लोक-निंदेची वाटुं नये खंती,
तुला यश बा ! मी सर्वकाळ चिंतीं;
तुझीं काव्यें येतील प्रसिद्धीसी,
तदा टीकेला पात्र तूंहि होसी !

परी टीकेनें कष्टि न तूं होईं,
धैर्य धरुनी रत उद्यमींच राहीं.
कवी होशिल तूं सुप्रसिद्ध, काळें,
तुझ्या समयीं दिसतील इतर, बाळें !

कवि-श्रेष्ठ अशी कीर्ति तुझी होवो !
शुक्ल इंदुपरी वृद्धितेंहि पावो !
तुला, अस्तगंत शत्रु, बघुनि होवो !
तुझें इच्छित वाग्देवि तुला देवो !

-रा. गोपाळराव पाटणकर,
( साबरी आगर. ) स० १९११

# प्रकाशकांचें हृद्गत !

छचुलें रडुं लागलें म्हणजे त्याचीं मातापितरें व भावंडें मंजुळ गाणीं गाऊन त्याचें मन रिझवितात आणि तेंहि विचारें मोहित होऊन रडायचें थांबतें ! गारुड्याच्या पुंगींतून निघणारे काव्यालाप ऐकून सापासारखा प्राणीही क्षणभर आनंदानें डुलूं लागतो ! शाहीराचीं कडवीं ऐकून हताश झालेला योद्धा आपली समशेर खरकन् म्यानावेगळी करून शत्रूचा घोट घ्यावयाला तयार होतो ! अगदीं दुष्ट मनोवृत्तीच्या माणसालाही काव्य-करुणालाप ऐकून रडें आल्याशिवाय रहात नाहीं ! आणि दुःखानें होरपळून गेलेलें अंतःकरण पूर्णपणें समाधानवृत्तींत आणण्यास काव्याचा जितका उपयोग होतो तितका दुसरा कशाचाहि होत नाहीं ! हा आजचाच अनुभव आहे असें नव्हे, तर फार प्राचीन कालापासूनचा आहे. महाभारतासारखे जे काव्यग्रंथ आज जगाच्या पाठीवर सर्वमान्यता पावले आहेत व ज्यांचा उपयोग प्राचीन व अर्वाचीन मानव जातीस सर्वकालीं सारखा होत आहे, त्या काव्यग्रंथाची थोरवी जितकी गावी तितकी थोडीच !

वरील विवेचनावरून इतकें सिद्ध होतें कीं, काव्य ही एक अजब शक्ति असून ती निर्माण करण्यांत परमेश्वरानें प्राणीमात्रांवर महदुपकार केलेले आहेत. मनुष्याच्या मनावर इष्ट ते संस्कार घडविणारी शक्ति बलवान् व निरुपद्रवी असावी लागते आणि ती काव्यांत आहे. कोणत्याही परिस्थितींत आनंदानें कालाचा व्यय करविणारा काव्यासारखा दुसरा कोणीही सोबती नाहीं ! आनंदानें वेळ घालवित असतां चटकन् आपण आपल्या तोंडून एखादें गाणें गुणगुणतों आणि दुःखानें होरपळत असतांहि शेजारच्या बालगंधर्वानें म्हटलेलें गाणें ऐकण्याकडे आपली प्रवृत्ती होते. यावरूनही काव्यलालसेची शक्ति प्राणीमात्रांत ठेवण्यांत परमेश्वराची कांहीं तरी गूढ योजना असली पाहिजे !

गाणें ऐकून आपलें मन रमतें, तर मग जो प्राणी काव्य निर्माण करितो, त्याच्या अंतःकरणाची स्थिति कशा प्रकारची असेल; याची यथार्थ कल्पना ‘ जावें त्याच्या वंशा ’ तेव्हांच कळणार ! व्यवहारांत अशा काव्य प्रसवणाऱ्या माणसांना आह्मीं “ खुळे ” अशी संज्ञा देतों ! परंतु वस्तुस्थिति तशी नसते

रसाचा योग्य परिपोष होऊन उत्कृष्ट काव्य व्हावयाला तादात्म्य वृत्तीचीं माणसें असावीं लागतात, आणि हीं माणसें जितक्या कमी अधिक तादात्म्य वृत्तीचीं असतील तितकें तें काव्य निरस अगर सरस वठतें.

कांहीं असलें तरी एवढी गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, मनाला स्वास्थ्य मिळण्याला काव्याची फार आवश्यकता आहे आणि आजचीं हीं काव्यपुष्पें हें ही केवळ त्याचेंच फळ होय. ही गोष्ट माझे मित्र श्रीयुत भा. शं. देवस्थळी यांनीं या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेवरून प्रेमळ वाचकांस कळून येईलच.

कवि जितक्या प्रगल्भ विचारांचा असेल तितक्या त्याच्या मनोवृत्तीही उच्च दर्जाच्या असतात. माझे मित्र श्रीयुत **माधव** कवि यांचें या बाबतींत मला फार अभिनंदन करावेंसें वाटतें ! ज्योतिषशास्त्रांत काय योगायोग असेल तो नकळे, पण गेल्या चार दोन वर्षांत अनेक आधुनिक कवींच्या पत्नींवर निर्घृण काळाची झडप पडली ! आणि त्यांच्या स्मरणार्थ अनेक काव्येंही प्रसिद्ध झालीं ! आजवर अशीं बाहेर पडलेलीं काव्यें आणि आजचें ' ध्रुवावरील फुलें ' हा काव्य गुच्छ यांत दर्जाच्या दृष्टीनें महदंतर आहे. ही गोष्ट प्रेमळ वाचकांनीं ' फुलांचा ' स्वाद घेतला ह्मणजे तेव्हांच कळून येईल

एका गोष्टीबद्दल लिहिण्याला मात्र माझी लेखणी नीटशी चालत नाहीं ! माझे मित्र श्रीयुत **माधव** यांच्या पत्नी कै. सौ. रमाबाई काटदरे ह्या इतक्या उत्तम कवयित्री असतील अशी माझी कल्पना नव्हती ! महाराष्ट्रांत पुष्कळ ' खुळे कवि ' स्वतः कविता करून त्या बायकांच्या नांवानें प्रसिद्ध करतात अशी आमची ठाम समजूत होती व आहे. कवियित्री मुळींच नाहींत असें आमचें ह्मणणें नाहीं, व ज्या कांहीं आहेत, त्यांच्याबद्दल आम्हांस पूर्णपणें आदरही आहे, पण प० सौ० **रमाबाई** काटदरे यांच्याबद्दलची भ्रामक कल्पना त्या हयात असतां दूर झाली असती तर आह्मांस फार आनंद वाटला असता ! पण त्या आनंदाइतकीच त्यांच्याबद्दल हळहळ वाटल्याचा प्रसंग यावा हें आमचें दुर्दैव होय ! प० सौ० **रमाबाईच्या** कवितांच्या स्वाद वाचकांनीं घेतला ह्मणजे तो किती मधुर आहे हें सहज कळून येईल.

काव्यग्रंथ ह्मणजे राष्ट्राचे खरे आत्मे होत ! तशा प्रकारचीं काव्यें निर्माण करणारीं माणसें या भरतभूमींत निपजावींत अशी प्रार्थना करून हा लेख संपवितों.

**बाळकृष्ण रावजी पालवणकर.**

# प्रस्तावना.

> 'शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा,
> अस्खलित चालवी गृह, धर्मी मज यष्टि जशि पथीं अंधा.'
>
> **मोरोपंत**—सभापर्व.

संसारांत मनुष्याला उत्तमोत्तम सुखाची जोड ह्मटली ह्मणजे सुरूप, सुशील आणि सुशिक्षित पत्नीचा समागम ही होय. अशा पत्नीचा लाभ ह्मणजे परम भाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे. हें भाग्य फारच थोड्यांच्या वांट्यास येत असतें; व एकदां सुदैवानें आलें असतां तेंही अल्पस्वल्पकाल टिकणारें असेंच असते असा बहुधा सर्वांचा अनुभव आहे असें ह्मटल्यास तें चुकीचें होणार नाहीं.

ह्या गोष्टीचा येथें उल्लेख करण्याचें कारण माझे मित्र **'कवि माधव'** यांच्या तरुण व सुशील पत्नीचें नुकतेंच घडून आलेलें अकालिक निधन हें होय ह्या पतिपत्नींच्या आचारविचारांत सदासर्वदा आढळून येणारी एकवाक्यता व कधींही यत्किंचितसुद्धां न दिसणारा विरोध यांच्यायोगें हा **रमा-माधवांचा** जोडा पाहून कोणालाही त्यांजविषयीं धन्यता वाटल्यावांचून रहात नसे. **'कवि माधव'** यांच्या प्रस्तुत पुस्तकांतील कांही कविता **'केसरी,' 'चित्रमयजगत्' 'नवयुग,' 'खेळगडी,' 'वैश्यमासिक,' 'मधुकर'** इत्यादिकांतून आधींच प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या ज्यांनीं वाचल्या असतील त्यांस यांच्या कवित्वशैलीविषयीं कांहीं विशेष सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. पुस्तकाचे शेवटीं पुरवणीरूपानें जोडलेल्या सौ० **'माधवांगने'**च्या कविताही स्त्रीस्वभावास अनुरूप, प्रेमळ व प्रसादयुक्त अशाच आढळतील. विशेषतः

'हृदयेश्वरास,' '**विरहिणी १,**' **विरहिणी २,**' या कविता खऱ्या खऱ्या आर्य-स्त्रीच्या अंतःकरणप्रवृत्तीच्या द्योतक असल्याचें पटल्यावांचून रहाणार नाहीं. यावरून ही कविकवयित्रींची जोडी परस्परांस किती अनुरूप होती हें कळून येण्यासारखें आहे. अशा दांपत्यसुखाची निर्घृण **काळानें** अचानक उडी घालून राखरांगोळी करावी याहून हृदयस्फोट करणारी दुःखास्पद दुसरी गोष्ट ती कोणती ? अशा स्थितींत विरहव्याकुल पतीस समाधानाचा उत्तम मार्ग ह्मणजे पत्नी-समागमांत प्राप्त झालेल्या सुखाचें स्मरण करून देणारे असे उपाय योजणें हाच एक होय; व याच उद्देशानें '**कवि माधव**' यांनीं आपल्या व प्रियपत्नीच्या निवडक कविता एकत्र करून त्या सांप्रत प्रसिद्ध करविल्या आहेत.

'**कवि माधव**' व त्यांच्या पत्नी यांच्या अंगीं चांगलेच कवित्वगुण असून, योग्य उत्तेजन व अनुकूल परिस्थिति यांच्या अभावीं त्यांची काव्य-कृती संख्येनें थोडी आहे तरी ती सत्कविकृतिमालिकेंत शोभण्यासारखी आहे असाच अभिप्राय पुढील कविता वाचून वाचकांचा होईल अशी खात्री आहे. हीं काव्यपुष्पें अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितींत प्रगट झालीं असल्यामुळें पुस्तकास दिलेलें '**भुवावरील फुलें**' हें नांव योग्यच आहे हें सांगावयास नको.

कोणत्याही पुस्तकाची प्रस्तावना पुस्तककर्त्यांच्याच हातची असावी हें इष्ट आहे; व त्याप्रमाणें ह्या पुस्तकाला '**कवि माधव**' यांच्याच हातची प्रस्तावना असणें योग्य होतें. तथापि आपल्या करुणाजनक स्थितीची कहाणी आपणच लोकांपुढें ठेवणें त्यांना संमत नसल्यामुळें त्यांच्या इच्छेवरून प्रस्तावनेदाखल हे दोन शब्द मीं मित्रकार्य ह्मणून लिहिले आहेत.

सौ. '**माधवांगने**'ची शेवटची कविता '**माझें स्वप्न**' ही आहे ही अपुरी आहे हें उघड आहे. ती महाराष्ट्रांतील कोणीतरी कवयित्रीनें पुरी करावी अशी '**कवि माधव**' यांची इच्छा आहे. व याच उद्देशानें या पुस्तकाची एक एक प्रत महाराष्ट्रांतील सर्व कवयित्रींस भेटीदाखल पाठविण्याचें त्यांनीं योजिलें आहे ही. त्यांची इच्छा आमच्या आधुनिक स्त्रीकविमंडळींतून कोणी पुरवितील अशी आशा प्रदर्शित करून हा प्रस्तावनालेख मी पुरा करतों.

**भालचंद्र शंकर देवस्थळी.**

# ध्रुवावरील फुलें !



सौ० रमाबाई कारदरे.

( माधवांगना )

जन्म, इ० स० १८९६. मृत्यु, इ० स० १९१५.

गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ?

—रघुवंशम्.

' खेळगडी ' प्रेस गिरगांव, मुंबई.

ग्रंथ संग्रहालय

# समर्पण !

## श्लोक.

जेथें भूमी सतत असते झांकलेली हिमानें,
तेथें कैंचीं नयनसुखदें दृश्य व्हावीं प्रसूनें ?
नाशायाला रवि न झटतो त्या हिमाच्छादनाला!
नाहीं पक्षीं ध्रुविंहि जन हे पाहते नंदनाला.

✻ ✻ ✻

होती माझी स्थिति खचित कीं त्या ध्रुवांच्या समान,
झाले बाले ! सकलहि तिरस्कारिते थोर सान;
केला त्यांनीं विदित तुजला केविं उत्साह–भंग,
नादाला या कितिक वदले निंदुनी ' रंग ढंग ' !

✻ ✻ ✻

लोकांमध्यें **कवि** ह्मणुनियां नांव कांहीं करावें,
पावो नाशा तनु मम तरी कीर्तिरूपें उरावें !
उत्तेजूनी जरि न असता त्वां दिला धीर मातें,
जात्या माझ्या खचित दयिते ! सर्व आशा लयातें!

✻ ✻ ✻

# ध्रुवावरील फुलें.

त्या कालीं जे स्वकिरण तुवां पाडिले चारुशीले !
त्यांच्यायोगें तिमिर हिमही नष्ट होऊन गेलें !
एकाएकीं रुचिर लतिका तेथ उत्पन्न झाली !
आनंदाची गमलि उभयां पर्वणी त्या सुकालीं.

❦ ❦ ❦

लागे तोंची अवचित कसा गार वारा वहाया !
हा ! हा ! तेणें मृदुल लतिका लागली क्षीण व्हाया !
राखायाला तिज वहु तुवां घेतले कष्ट आर्यें !
तेणें वल्ली जगुनि पुढतीं जाहलीं इष्ट कार्यें.

❦ ❦ ❦

आलीं तीच्यावरि तव ह्यातींत कांहीं प्रसूनें,
त्यांपैकीं हीं निवडुनि तुला अर्पितों आदरानें.
एका कालीं तव मृदुकरस्पर्शनें धन्य झालीं,
आलें घेणें स्मृतिस तुझिया वाहुनी तत्कपालीं ! ! !

**माधव.**

# अनुक्रमणिका.


१ उषा. ... ... ... ... ... ... १
२ आराध्यदेवतेस. ... ... ... ... ... ४
३ ईशप्रार्थना. ... ... ... ... ... ५
४ सीतारामसंवाद. ... ... ... ... ... ६
५ मांगल्यचिंतन. ... ... ... ... ... ९
६ मयूर-केकावली. ... ... ... ... ... १०
७ दया. ... ... ... ... ... १२
८ सरितेस. ... ... ... ... ... १३
९ बाळा ! नीज. ... ... ... ... ... १४
१० अरसिक आणि कळी. ... ... ... ... १५
११ कोकिळाचें शांतवन ... ... ... ... १७
१२ सद्गुणाचा प्रभाव. ... ... ... ... ... १७
१३ मेघ आणि चातक. ... ... ... ... १९
१४ नव्या खेळगड्याची विचारपूस. ... ... ... २०
१५ झपूर्झा ! ... ... ... ... ... २१
१६ बालकवीचें गायन. ... ... ... ... ... २२
१७ इंद्रधनुष्यास. ... ... ... ... ... २३
१८ गुलाबास. ... ... ... ... ... २५
१९ शरत्कालांतील एक सरोवर. ... ... ... ... २६
२० चंद्रास उद्देशून. ... ... ... ... ... २७
२१ शिशिरकाल. ... ... ... ... ... २८
२२ वसंतकाल. ... ... ... ... ... २९
२३ ग्रीष्मकाल. ... ... ... ... ... ३१
२४ कारंजें. ... ... ... ... ... ३२
२५ वर्षाकाल. ... ... ... ... ... ३३
२६ भगवान् कर्दमाला दर्शन देतात. ... ... ... ३९
२७ सूर्योदय. ... ... ... ... ... ४४
२८ चहागीत. ... ... ... ... ... ४५

२९ खारीची शिकार! ... ... ... ... ... ४७
३० तात्यापंतोजी. ... ... ... ... ... ५०
३१ गोपूकाका. ... ... ... ... ... ५२
३२ लेडीहार्डिंज निधन. ... ... ... ... ५८
३३ कवि किती कवनीं पारि वर्णिती ? ... ... ... ५९
३४ मयूरास. ... ... ... ... ... ६०
३५ राजहंसास. ... ... ... ... ... ६४
३६ भ्रमरास. ... ... ... ... ... ६७
३७ मेघमुक्त वासरमणीस. ... ... ... ... ७०
(३८) स्फुट. ... ... ३; ११; ३०; ४३; आणि ५१

## पुरवणी.


१ पहिला यशस्वी प्रयत्न. ... ... ... ... १
२ हृदयेश्वरास. ... ... ... ... ... २
३ विरहिणी. [ १ ] ... ... ... ... ... ३
४ विरहिणी [ २ ] ... ... ... ... ... ४
५ मातृस्मरण. ... ... ... ... ... ५
६ श्रीरामाचें अयोध्येंत आगमन. ... ... ... ६
७ वनमाळी. ... ... ... ... ... ८
८ अखेरची कविता. ( माझें स्वप्न. ) ... ... ... ९

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | शब्द. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| ३ | ५ | ४ | अश्वमती | अश्ववती |
| ९ | १८ | ३ | राजराजगतिल्का | राजराज-तिलका |
| ३१ | ३ | १ | गेलां ! | गेलीं ! |
| ३३ | टीप २ | २ | क्षेप | क्षेपक. |
| ५१ | टीप २ | ३ | thongh | though |
| ५६ | ४ | ३ | दिघलें | दिधलें. |
| ६४ | टीप ४ | १ | भाक्ता. | भोक्ता. |

## पुरवणी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | २४ | ५ | हत्पात्रिं | हत्पात्रिं |
| ३ | २३ | १, ( २ ) ३ | कधिं तदिय | कधिं न तदिय |



ध्रुव प्रदेशांतील उषा.

काळे 342

# ध्रुवावरील फुलें !

## उषा.

( ऋग्वेद, सूक्त ९२ च्या आधारें. )

[ चाल–पूर्वसमुद्रीं० ]

पूर्व दिशेला ध्वजा फडकली उषा सुंदरींची,
गगन–विताना रंगविताती किरणें हीं त्यांचीं !

आयुध–धारी वीरासम ह्या तेजस्वी युवती,
माता, छे छे ! प्रतिधेनुच ह्या नभःपथीं येती !

आनंदानें नाचत पुढतीं अरुण पहा आला !
ह्या देवीही आल्या द्याया प्रकाश जगताला.

दिव्य सुशीला धेनु जोडिल्या स्वरथातें त्यांनीं,
निरुपम तेजा धारण केलें अंगीं ललितांनीं;

नीतिमंत जे भक्त, जयांच्या सोम गृहीं सिद्ध,
उत्तम ऐसे हविर्भाग जे अर्पितात नित्य,

त्यांसाठीं ह्या दुरुनी आल्या रथांतुनी नारी-
धनें घेउनी; प्रभा वितरती अवनीवर सारी !

* * *

नाना रूपां धारण करिते, नटीच कीं आहे !
विशाल वक्षःस्थलही जीचें आवृत नच राहे !

प्रकाश जीचा पसरुनि लोकीं विदारितो तिमिर,
द्युलोक-कन्या ल्याली ती ही अलंकार रुचिर !

हिच्या प्रसादें सर्वहि झालों अंधकारमुक्त,
प्रकाश पाडुनि उषा करी निज-हेतूंतें व्यक्त.

सस्मित-वदना, दीप्तिमती ही कवितेसम रम्य,
कृपा कराया नभीं पातली; धन्य सती धन्य !

स्फुरवी चित्तीं सत्य, मधुरता, तेजाची खाणी—
उषा देवता स्तविली सादर असे **गोतमांनीं.**

देसी आह्मां उषे दयाले ! सामर्थ्यें जीं जीं,
लाभति तेणें संतति, योद्धे, धेनु तसे वाजी.

तुझ्या प्रसादें बलोद्भवे हे कीर्तिमती देवी !
' वीरांचा हा नायक ' ऐशी मम कीर्ती होई.

सेवक सदनीं कितीक असती सादर सेवेला,
वैभव माझें दाविति लोकां अश्वांच्या शाला.

✻ ✻ ✻

कृपाकटाक्षें सती अखिल या लोका अवलोकी,
नभोमंडलीं उज्ज्वल किरणें अपुलीं मग फेंकी !

प्रकाशोनियां करी जागृती भूवरि ही जींवीं,
प्रतिभाशाली कविनीं स्तविली धन्य उषा देवी.

पुनः पुन्हा जन्मते तरि जिला पुरातना गणितीं,
समानवर्णी वस्त्रें जीच्या तनुला भूषवितीं,

श्वघ्न नरासम हानिप्रिय जी, आयु हरित राहे
ती ही येथें उषा देवता विराजली आहे !

तेज पसरलें स्वर्गाच्याही सीमेपर्यंत,
झाला आतां वास्तव्याचा रजनीच्या अंत !

मर्त्य-जीवितां क्षीण करित ही प्रकाशते आहे,
निजप्रियाच्या दिनराजाच्या कांतीतें लाहे !

अब्धि जलाचें, तसें पशूंचें ही ललिता सुभगा,
करी प्रदर्शन; निज-तेजानें शोभवि गगन-पथा.

देवाज्ञा-पालनीं सदा ही दक्ष पुरी राहे,
उषा सुंदरी रविरश्मींनीं प्रकाशली आहे!

बल-संपन्ने! उषे! करावें भाग्यवंत आह्मां,
पुत्रपौत्र होउनी आमुच्या शोभवोत धामां!

सत्यवादिनी, मंजुभाषिणी, गोमति, अश्वमती!
आह्मांवरतीं पडो सदा तव विभवप्रद कांती.

रक्तवर्णसे तुरग आपुल्या रथा उषे! जोड,
येउनि आह्मां दे तूं करुनी सौख्यांची जोड.

रिपु-विध्वंसक दस्रदेव हो! रथ घेउनि या! या!
गोधन कांचन घरीं आमुच्या भरुनी टाकाया!

उज्ज्वल तेजा असे आणिलें इहलोकीं ज्यांनीं,
या ते आतां सामर्थ्यातें आह्मां घेवोनी!

प्रभातकालीं उभय सूर्य-सुत देवांसमवेत,
सोमरसाचें पान कराया इकडे येवोत!

(इ. स. १९१३)

---

## स्फुट (मालाकार)

होई भानु प्रखरतर ज्यामाजि त्या ग्रीष्मकालीं,
अल्पें तोयें तरुवर लता त्वत्करें पुष्ट झालीं!
मालाकारा! कधिंतरि तयां पुष्टि का ती मिळेल?
प्रावृट्कालीं सततहि जला वर्षले मेघजाल. १

जगन्नाथ (भाषांतर)

# आराध्य-देवतेस:-

[ पुढील पद्य कल्पनेस उद्देशून आहे; तरी तें सर्वसाधारण कल्पनेस लागू नसून काव्यकल्पनेसच आहे एवढें ध्यानांत ठेवल्यास दुर्बोध होऊं नये असें वाटतें. ]

रुचिरतमदेहिनी ! कल्पने ! मोहिनी !
कविमनोवासिनी ! देवते ! स्वामिनी !

त्वत्प्रभावें किती
तारका हांसती
मधुरसें बोलती
वदन नसुनी ! १

भक्ति घे धवलिमा
प्रेम घे रक्तिमा
पाप घे कालिमा
तुजसि नमुनी. २

सुयश तें पांढरें
हास्यही पांढरें
तुजमुळें हें खरें
दिव्य रमणी ! ३

मधु सुधा निर्मिली
सुर-वरां ती दिली
कवनिं परि ठेविली
याहि भुवनीं ! ४

नाक चांफेकळी
दंत मुक्तावली
तुजमुळें जाहलीं
भामिनीचीं ! ५

भ्रू धनू जाहली
सोडि बाणावली
वेणिही शोभली
सर्पिणी कीं. ६

हस्त ते पंकजें
नेत्रही पंकजें
पादही पंकजें
करिसि कवनीं. ७

अचर जे चर तयां
बोलके करुनियां
देसि गे ! वाङ्मया
काव्य रमणी ! ८

भूतलीं क्षणभरी
तोंचि उडसी वरी
कोण गे ! तव सरी
करिल भुवनीं ? ९

रोष तूं कविवरी
धरिसि जरि सुंदरी
दावि तो गुण तरी
काय कवनीं ? १०

(इ स. १९१०)

# ईशप्रार्थना.

२,१०५ ३

## श्लोक.

प्रभो ! तूंच गा आमुचा मायबाप,
दयाळा तुला लेश नाहींच कोप !
जगन्नायका ! आमुचा तूंच राजा,
सखा साह्यकारी विभो ! तूंच माझा. १

जगीं चालले तर्क लोकांत नाना,
वृथा भांडती, कोणि कोणा पुसेना !
सहस्रावधी स्थापिताती मतांतें,
तुला सर्वथा नेणुनी विश्वमाते ! २

असें अज्ञ मी हीनही देवराया !
परी हांव नामीं तुझ्या गा ! रमाया.
नतीं नेणशी भेद कारुण्य-सिंधो !
नमस्कार माझा तुला दीन-बंधो ! ३

जरी तान्हुल्या चालतां कांहिं ये ना
पडे, झाजरे सोडितेंना प्रयत्ना !
धरोनी करें शीकवी माय त्याला,
शिके, धांवुनी बाळ दे कौतुकाला ! ४

तसा चालतों मीहि संसारवाटे,
पडें सर्वदा, बोंचती फार कांटे !
प्रभो ! ध्या तरी काळजी बाळकाची,
पडावी गळां दिव्य माळा यशाची ! ५

वसो नम्रता नित्य चित्तांत देवा !
घडो सर्वदा सज्जनांचीच सेवा;
सदानंदवृत्ती ढळूं दे न साची,
सदा दाखवीं पर्वणी मंगलांची ! ६

असे राहिलें पूर्ण पावित्र्य ज्यांत,
तया आदराया असो सज्ज चित्त.
गुणी जे तयीं हीन किंवा कुलीन,
गमो भेद हा मानसाला कदा न. ७

मन सतत असावें दक्ष कर्तव्यकर्मी,
अढळहि अनुरक्ती बा! रहावी स्वधर्मी;
सकरुण भगवंता! हीच माझी शिराणी,
करिं सफल तियेला प्रार्थितों चक्रपाणी! ८

---

## सीतारामसंवाद.

### श्लोक.

कैकेयिच्या ऐकुनियां वचाला,
जाया वनीं राम सखा निघाला!
'देईं निरोपा' दयितेस बोले,
झाले तदा राघव--नेत्र ओले! १

'लागे वनांतरिं जरी मज देवि! जावें,
शोकार्णवांत सखये! नच मग्न व्हावें.
सारंग-बाल-नयने! वद कोण टाळी?
ज्या ज्या विपत्ति विधि घालितसे कपाळीं! २

राहून मागें नियमां व्रतांतें,
त्वां चालवावें स्मरुनी प्रभूतें,
कोणा न दुःशब्द कदा वदावा,
देहीं सदा सद्गुण वावरावा! ३

देवांस वंदन करीं उठुनी प्रभातीं,
त्यानंतरें श्वशुर-पुण्य-पदांस वंदीं.

सासूस मंजु वदुनी करि सांत्वनातें,
कन्या मदीय, नच सून, गमो तियेतें! ४

कैकेयीशीं सुमित्रेशीं, प्रेमभावेंच वागणें.
घेउनी नम्रता त्यांचा योग्य सन्मान ठेवणें. ५

शत्रुघ्ना भरतास बंधु गणुनी प्रेमा करीं त्यांवर,
आतां राजपदीं असे भरत गे! त्यातें उणें उत्तर
बोलावें न कदा, सुनीति सुखदा, तीनेंच चालें सदा,
मी जातों निबिडाटवींत तिथली भोगावया आपदा! ६

जलधरसम वाटे सांवळी राममूर्ती,
जनक-नृपति-कन्या वीजशी भासली ती!
नयनिं जल निघे जें येउनीयां उमाळा,
मज मनिं गमतें कीं तोचि पर्जन्य झाला! ७

मंदानिलें कदलि जेविं सकंप व्हावी,
झाली तशी पतिवचा परिसोनि देवी.
दीनस्वरें वदतसे मग राघवाला,–
"कां नाथ! रुष्ट अबलेवर आज झालां? ८

झाला असेल अपराध अभागिनीचा
त्या दंड हाच गमला मनिं काय साचा?
शिक्षा दुज्या बहु, करा उपयोग त्यांचा!
व्हावा वियोग मज या न कदा पदांचा. ९

जो धीर वीर अशि गर्जत लोकवाणी,
स्त्रीत्याग त्यास जगतांत लघुत्व आणी.
आलें वनांत फिरणें जरि राम–भालीं.
सीता पतीसह तरी विपिनीं निघाली! १०

प्रासाद, अश्व, रथ, वैभव व्यर्थ सारें!
होतील तापद सुगंधित शीत वारे!

भूषा, दुकूल, मणि हीं तिजला कशाला
लाभे न भर्तृ–सुख लेशहि ज्या सतीला ? ११

शिकवि बालपणीं मज माउली,
गृह सतीस खरें पति–सांउली.
तरुस सोडुनि राहति ना लैता,
कुलवतीहि तशा पतिला कदा. १२

सीतेप्रती पतिसवें फिरतां वनांत,
वाटेल हर्ष जितुका निज–मानसांत,
होई मुलींस तितुका न कदापि नाथा !
फारां दिनींहि निज-मातृगृहास जातां. १३

व्याघ्रादि हिंसक जिथें पशु राहतात,
त्याही भयंकर अशा गिरि–कंदरांत,
रामांगने पतिसवें भय लेश नाहीं !
उल्लंघितां नग दऱ्या श्रमही न कांहीं ! १४

वृक्षांखालीं जाउनी ही फलांतें,
वेंचोनीयां रोज आणील हातें.
सौख्यामाजी मात्र वांटेकरीण,
आर्या ऐशा स्त्रीस बोलेल कोण ?" १५

श्रीरामाचीं भाषणें व्यर्थ झालीं !
नाथासंगें जानकीही निघाली.
संवादातें त्यांचिया गावयाला,
वाटे चित्तीं मोद या माधवाला. १६

(इ. स. १९१२)

# मांगल्यचिंतन.

## श्लोक.

ज्याचा कळे नच कुणासहि आदि अंत,
विश्वाचिया जनन–मृत्युस जो पहात !
तो कालही तनय शोभतसे जयाचा,
भूपा ! तुझें शिव करो प्रभु तोच साचा ! १

मुद्रा भद्रा शुक्र चंद्रासमान–
वाढे, जीतें देतसे विश्व मान,
ती कल्याणी बा ! विराजो सदैव,
देवो तूतें आयुरारोग्य देव ! २

होवोत शत्रुजन ते तव मित्र पूर्ण,
वैराग्नि जाउ अवघा मनिंचा विझून !
शोभे जसा विधु नभीं उडुमंडलांत,
सामंत–चक्रिं नृप तूंहि तसा नितांत ! ३

सूर्यासंगतिं ती प्रभा, तशिच कीं चंद्रासवें चांद्रिका,
श्रीविष्णूसह इंदिरा सुरुचिरा, ईशासवें अंबिका.
तैशी शोभतसे तुझ्यासह वधू **मेरी** सती सुंदरी,
त्या देवीसह राजराजगतिलका ! साम्राज्य सौख्यें करीं. ४

×" साकेतीं रघुनाथ सानुजसुहृद् राज्यासि जेव्हां करी "
दुर्नीतिप्रति मात्र भीति, कवि हें वर्णी पुराणांतरीं,
चिंतामात्र सचिंत एक दिसली, तें येउंदे प्रत्यया,
पाळा सर्वहि दीर्घकाल वसुधा प्रेमें तुह्मी राजया ! ५

पावो उन्नति वैश्यवृत्ति, वसते लक्ष्मी सदा जीसवें,
सौख्यामाजि असो कृषीवल, तुझे गावो नृपा ! गोडवे.

---

× **मोरोपंत**—कुशलवचरित.

शास्त्रें नाटक काव्य यांप्रति असो भूपा ! तुझा आश्रय,
विद्यादान मिळो असेंच सकलां, वाढो सदा वाङ्मय. ६

सुनयनिपुण ऐसे नित्य लाभोत मंत्री,
अपरिमित सुखानें तुष्ट होवो धरित्री !
जलद सलिलधारा वर्षुनी धान्य देवो !
सकरुण परमात्मा न्यून कोठें न ठेवो ! ७

साम्राज्यावरि मावळे नच रवी, ज्याची मुखें थोरवी–
गाती श्रेष्ठ कवी, प्रजामनिं वसे प्रीती सदाही नवी,
त्या जॉर्जाभिध हिंद-भूमिपतिचें भार्या अपत्यांसह,
हा संवत्सर होउनी सुखनिधी—
"**कुर्यात् सदा मंगलम्**" ८

---

## मयूर--केकावली.

पृथ्वी. रवि प्रखर जाहला, मृगजळें दिसूं लागलीं,
जनें बहुत तापलीं, सकल पल्वलें आटलीं !
तरी जलद एकही नच दिसे नभोमंडलीं,
'*म्हणोनि करुणस्वरें करि मयूर केकावली.' १

" 'दया,' वदति तोयदा, 'सुजन जे तयां भूषण;'
दयार्द्र मन आपुलें, करितसां स्वभक्तावन;
तरी सलिल वर्षुनी त्वरित शांतवा या जना,
असे वचन, 'उत्तमीं विफल होइना प्रार्थना.' २

अगा जलधरा ! नसे तुजविणें अह्मा आसरा !
उदार-वर तूं खरा, करिसि शांत तोयें धरा;

---

*केकावली–क्षेपक श्लोक.

३५२११

निदाघ करि घावरा, ह्मणुनि ये करोनी त्वरा !
जगद्-व्यसन संहरा, प्रखर ताप सारा हरा. ३

अधीर बघ जाहले कुटज हे तुझ्या स्वागता,
सुमें स्वकरिं घेति ते तुजसि वाहण्या तत्त्वतां.
नभीं तुज पहावया फिरतसे बलाकावली,
घना न तुझियाविना तिज दुजी कृपा-सांउली ! ४

दिसो चमकतां तुझ्याजवळि धन्य सौदामिनी !
गळो अमृततुल्यशी विमल वारि-धारा झणी !
पडो श्रवणिं या तुझें स्तनित गा ! सदा श्यामला !
कराल इतुकी दया खचित हीच आशा मला." ५

द्रवे परिसुनी पयोधर मयूर-केकावली,
अपार पय, येउनी, स्रवतसे पहा ! भूतलीं;
प्रवाह किति चालले करित शब्द नानापरी,
गमे जलमिषें दया वितरतो घन-श्रीहरी ! ६

## स्फुट ( शिव-स्मरण )

वाहे गंगा झुळझुळ जटेंतून अंकीं उमा ते,
भालीं साजे अमृतकर, तो वर्षतोहे सुधेतें !
हास्यें शोभे सुवदन, गळां लोंबते रुंडमाला,
भक्तांना जो शिवकर सदा, वंदितों त्या शिवाला. १

# *दया.

## अनुष्टुप्.

साध्य नोहे कदा यत्नें, स्वाभाविक दया-गुण,
रत्नीं युक्त जरी राजा, शोभेनाच तयाविण. १

वीरां खड्गाहुनी शोभे, भूपांतें मुकुटाहुनी,
धनिकां इंदिरेहूनी, स्त्रियांतें चारुतेहुनी. २

तृषिता भूवरी मेघ, जैसा तोयास वर्षतो,
श्रेष्ठ नीचावरी तैसा, करुणा-जल सिंचितो! ३

दात्या स्वीकारित्या दोघां करुणा शुभ वांछिते,
तोषे दात्यावरी, त्याच्या पसरी शुभ्र कीर्तितें. ४

भूपां तेविं समर्थांतें दया फारचि शोभवी,
प्रबळीं प्रबला होई, नैष्ठुर्या दूर घालवी. ५

भय-श्री युक्त जी शक्ति ऐहिका तीस दाखवी—
राजदंड सदा, येणें प्रेमज्योतीस मालवी! ६

तया दंडाहुनि श्रेष्ठ दया निःसंशयें असे,
दंडाच्या शासनीं देह, दयेच्या मन येतसे! ७

भूपीं वसावया योग्य ईश्वरी गुण हा असे,
तद्योगें नृप हा मर्त्य परी 'देवांश' होतसे. ८

जेथें न्याय दया प्रेमें एकत्र वसती सदा,
न पावे भूपशक्तीशीं विरोधा ईश्वरी कदा ९

रसाले! चारुशीले गे! कोमले! देवते! सति!
न्यायस्वसे! दये! तूतें मंद हा कारि वंदना. १०

(इ. स. १९१०)

---

* 'Merchant of Venice नाटकांतील The quality of mercy is not strained इत्यादि ओळींच्या आधारें रचलेलें पद्य.

# सरितेस:—

[ कविवर्य *केशवसुतांची ' भृंग ' कविता वाचून मनांत आलेले विचार. ]

सरिते ! ऐकुनि तव गान,
गेलें सारें मम भान !
कवयित्री तूं मात्र खरी,
जगतीं कोणी नच दुसरी !
जोडुनि कोणी 'री'ला 'री',
ह्मणवी कविता करणारी !
कवन नव्हे तें जातीचें,
केवळ गाणें स्वार्थाचें !
स्वार्थें मोहें आणि मदें,
केलें अंध अम्हा पुरतें !
जुळवुनि यमक प्रास गण,
आह्मीं त्या ह्मणतों कवन !
कवनीं नाहीं लेश रस,
वदतों त्याला परि सुरस !
नगराजाची तूं बाळी,
निर्मलतेची कीं पुतळी,
तव गायन तें स्वर्गीचें,
पावित्र्यें भरलें साचें,
अशीच देवी ! गात रहा !
जग तेणें पावो मोहा !

तीरावरतीं द्विजसंघ,
गानीं झाला बहु दंग,
गानाचे विविध च्छंद,
त्यांत वसे प्रेमानंद.
' जीवन माझें आनंद,'
गातो आहे बघ भृंग !
'जीवन अमुचें आनंद '
हांसुनि सांगे सुमवृंद.
तुझेंहि जीवन आनंद,
ऐकुनि वाटे तव शब्द.
बाला असतां उद्यानीं,
खेळलीस तूं हर्षोनी;
फुलझाडां घालुनि पाणी,
त्यांवरुनी ह्मटलिस गाणीं !
तुज तेव्हां वदलें कोणी
'होशिल ग सागर-राणी !'
राग तुला मग किति आला
आठवतें का तें तुजला ?
बालपणीं रुसणें फुगणें,
शुद्धमनें सारें करणें.

* प० वा० कृष्णाजी केशव दामले, हे आधुनिक कवींत श्रेष्ठ असून वरील नांवानें प्रसिद्ध आहेत.

परि जातां तें बालपण,
स्वार्थ वघे डोकावून !
हृदयिं न तेणें आनंद,
सर्व सुखांचा जो कंद.

परंतु देवी ! तव त्र्यत्ति,
पूर्ण दिसे मज आनंदी !
आनंदें पुढतीं जाशी,
एक रूप पतिशीं होशी.

व. ति. आनंदपूर्ण करिशी मम कां न चित्त ?
मी हीन मानव असें मनिं काय येत ?
होवोनि मीन हृदयीं तव राहतों मी !
आनंद दे मजसि, मी नच अन्यकामी. १

(इ. स. १९१२)

## बाळा नीज !

मालिनी. " निज निज निज आतां तान्हुल्या ! पाळण्यांत,
दिवस निघुनि गेला, वाहतो शीत वात !
चमकति नभिं तारे, हो तरी अंधकार,
चिमुकलि न उदेलीं आज ती चंद्रकोर ! १

श्रवणिं भयद येती गर्जना जंवुकांच्या !
खळ 'किणकिण' शब्दां लेश नाहीं किड्यांच्या,
तरुवरि घुबडांचा होय घूत्कार थोर !
मिळविति अपुलाही गर्दभें त्यांत सूर. २

सुखकर शिशुलीलां योग्य हा काल नाहीं,
ह्मणुनि शयनिं आतां स्वस्थ तूं झोंप घेई !
निज निज निज सोन्या ! बैसतें मीहि येथें,
वदत वदनिं 'जो जो' पाळणा हालवीतें. ३

नभिं वधुनि उषेला पक्षि गातील गाणीं,
खुलतिल मग बागा रम्य ऐशा फुलांनीं !

उगवुनि तंव देई जो नव्या वासराला,
उठविल रवि तोची माझिया वांसराला. ४

ह्मणत मधुर गीतें माउली श्रांत झाली,
परिसुनि मधु गीतां बालका झोंप आली !
हलुच मग तयाच्या चुंबनालागिं घेतां,
अमृत-रसहि वाटे तुच्छ त्या मातृ-चित्ता ! ५

✤ ✤ ✤

व. ति. स्वर्गीयता, विमलता, शुचिता जयांत,
पीयूष तेंहि लघुतेप्रति येथ घेत !
सामर्थ्य हें मज गमे नच चुंबनाचें,
त्या गोजिऱ्या चिमुकल्या परि बालकाचें ! ६

# अरसिक आणि कळी.

## पद.


सुखकरशा प्रातःकाळा,
मल्लिके नव कळी आली.
हास्याची मूर्तिच झाली,
कविजना अशी ती गमली !
जन्माचें सार्थक झालें,
लतिका-मन हर्षे भरलें.
प्रेमानें त्या कलिकेतें
माता ती आशी देते.
वाऱ्याची झुळुकहि आली,
कलिकेतें त्या कुरवाळी !
भ्रमरी तिथ गुंजत आल्या,
पाहुनी तिला मनिं धाल्या

हिमबिंदु येउनी तिजला,
मोत्यांची देती माळा !
देखोनि कळीची कान्ती
थक्क होय कुसुमाराती !
कवि बोले प्रेमें तिजला,
'अर्पीन तुतें कवनाला.'
रवि पावे तों उदयाला
घेउनी रुपेरी शेला.
करि हास्य पाहुनी कळिला
स्पर्शिता तिला मग झाला
कलिका-मन रंजविण्याला
द्विज गाती मधुगीताला.

जल-वर्षा करि कारंजें,
त्यामुळें कळी ती रंजे.
उत्कंठा ही सकलांला,
गंधें कधिं भरि जगतीला.
तों हृदयीं ज्याच्या नाहीं,
आर्द्रता लेशही पाहीं !
आनंद दुःख ना ज्याला,
सुमभर जरि आला गेला !
करि सृष्टिदेवता लीला
कंदूक करोनी शशिला,
गगनीं तो उंच उडाला !
कौतूक परी नच ज्याला,
उपवनिं तो अरसिक आला,
कंप तों लतेला सुटला !
कळि पाहुनि तेथें गेला,
निर्दय तो तोडायाला !

मल्लिका कितीतरि रडली,
पायांही शतदां पडली !
मति त्याची परि नच फिरली !
अधिकाधिक निष्ठुर बनली !
नीचाच्या लत्ताघातें,
पावली माय मूर्च्छेतें !
कन्येला घेउनि गेला
हरि हाय तिच्या प्राणांला !
मृद्वंगी निर्मल बाळी
कलिका ती नष्ट जहाली !
सकलांचा आशाभंग,
झालासे येणें सांग !
कवि तेणें वेडा झाला
भटकतो पुसत सर्वांला.
"मल्लिका कळीतें कोणीं,
देखियलें का उद्यानीं ?"

(इ. स. १९११)



# कोकिळाचें शांतवन.

## पद.

कोकिळा! आला, कां म्लानपणा वदनाला?
कुठें गर्जना जंबुक करिती,
घूकारावहि कोठें निघती,
स्वैर पिशाच्चें रानीं फिरती!
निशा-समयाला, ह्मणुनि का धीर तव गेला? १
शिशिर नांदतो भूमितलावरि,
फुलें न दिसतां वेड्या भ्रमरी-
पहा! भटकती वनीं कुठेंतरि!
मोद मनिं झाला, त्वद्दशा बघुनि काकांला! २
काक असें तुज कोणी गणिती,
धैर्य धरावें परि निज-चित्तीं;
आम्र वसंतीं जेव्हां फुलती,
पिका वेल्हाळा! भ्रम त्यांचा जाय लयाला! ३

---

# सद्गुणाचा प्रभाव.

## श्लोक.

'हे केतकी! भरुनि गेलिस कंटकांनीं,
केला निवास जवळी अहिच्या कुलांनीं!
आधींच दूषित, तशांतहि दुष्ट-संग,
नादें तुझ्या ह्मणुनि ये कठिण प्रसंग. १

मराठी ग्रंथ संग्रहालय

दुर्गंध नित्य पसरे अति दूर ज्याचा,
सांठाच जो गमत सर्व अमंगलांचा,
त्या कर्दमांत तव जन्म असे जहाला!
आला तुझ्या म्हणुनि हीनपणा कुळाला. २

कां गे तरीहि जन हे तुज मान देती?
मोहून जाय बघतां तुज भृंगपंक्ती.
ऐसा तुझ्याजवळि काय अपूर्व ठेवा?
ज्या कारणें रसिकही तुजला भुलावा. ३

तों बोलला भ्रमर येउनि एक मातें,
"ठेवा हिचा विदित सर्व असे जगातें.
जो नंदनांतिल फुलांसहि लाजवीतो,
होतो प्रफुल्लित हिच्यावरि केवडा तो. ४

त्याचा सुवास पसरे बहु दूर दूर,
तो टाकितो रसिक-चित्त करोनि गार!
येणेंच मान मिळतो जगिं केतकीस
कोणीहि ना तरि करील विचारपूस." ५

उचित वचन ऐसें ऐकुनी बंभराचें,
क्षणिं निरसन झालें माझिया संशयाचें.
जरि महतिस देई एवढ्या एक गूण,
निधिच मग गुणांचे त्यांस वर्णील कोण? ६

---



# मेघ आणि चातक.

## श्लोक.

तेजा रवीच्या हरिलें घनांनीं,
आच्छादिलें अंबर सर्व त्यांनीं !
तें पाहुनी चातक हर्ष मानी,
'होईल' बोले 'सफला शिराणी. १

केलें तपा संतत अष्ट मास,
स्वप्नांतही चिंतियलें जयास,
तो मेघ ये आज उदार–राणा !
कां श्रेष्ठ तो दीन जनीं द्रवेना ?' २

तों अभ्र शीर्षावरि शुभ्र आलें,
त्या वंदुनी चातक दीन बोले,
' पीडां तृषेची जलदा ! निवारा
वर्षोनियां निर्मल वारि-धारा. ' ३

आलें तसें अभ्र निघून गेलें !
उद्विग्न तेव्हां खग चित्त झालें.
गेले तसे आणिक मेघ कांहीं,
केली धरा कंपित गर्जनाहीं ! ४

सांगे तदा माधव त्या द्विजाला
'ज्या त्या सख्या ! प्रार्थिसि कां घनाला ?
हे शुष्क का सोडिति पाझराला ?
बा ! आर्द्र जो नीरद तो निराळा ! ५

दाता कळे पाहुनि तन्मुखाला,
त्या प्रार्थणें योग्यचि याचकाला.
परंतु जे केवळ नामधारी,
याञ्चा तिथें व्यर्थचि होय सारी.' ६

# नव्या खेळगड्याची विचारपूसः-

पद.

"कोठुनि तूं येसी येथें ?
तान्हुल्या ! सांग आह्मांतें."

'स्वर्गांतुनि येथें आलों,
तुमचा मी बंधू झालों.'

"हे पाणिदार तव डोळे
तुज कैसे प्राप्त जहाले ?"

'गगनांतुनि मी येतांना
देवें मज दिधलें त्यांना.'

"अश्रु हे कुठें रे तुजला
लाधले ? सांग आह्मांला."

'येथेंच अश्रु हे होते
जन्मतां लाधले मातें.'

"हे गाल असे कां झाले ?
कीं गुलाब जैसे फुलले."

'पाहुनी तुह्माला झाला
मोद तोच गालीं भरला.'

"स्मित कोणीं दिधलें तुजला ?
छकुल्या रे ! कथि आह्मांला."

'अप्सरा चुंबुनी मातें,
देत्या मज झाल्या त्यातें.'


"माकुल्या छान कानांला,
तुज देता कोण जहाला ?"

'देवानें आज्ञा केली
कानांची जोडी आली !
हस्तादिक अवयव मजला,
देवच तो देता झाला.'

"तव लाभ कसा आह्मांला
सोनुल्या ! सांग रे झाला ?"

'देवें मज धाडुनि दिधला
खेळगडी तुमचा केला.'

"केवढी कृपा हीं प्रभुची !
या स्तुती करूं तर त्याची."



# झपूर्झा !

[ १ ]

दूर एकला बैसून,
कोण करी मंजुळ गान ?
कोण गातसे झपूर्झा ?
केशवसुत माझा राजा !
फुलें विकसलीं,
उमेद आली,
चित्तें स्फुरलीं !
तुतारि ऐकुनि कृष्णाची !
झपूर्झा गडे ! झपूर्झा !

[ २ ]

सुखदुःखाचें नच वारें !
विकारही मेले सारे !
पृष्ठीं लाटा किति येती,
आंत परी अचला शांती !!
गभीर सागर,
निर्मल निर्झर,
असा निरंतर;
जागा राहुनि गान वदे
'झपूर्झा गडे ! झपूर्झा !'

[ ३ ]

करी झपूर्झा जन वेडे !
झपूर्झाच हें जग झालें !
जिकडे तिकडे झपूर्झा !
उच्चनीच हा नच दर्जा !
खालतिं आले,
वरी चालले,
एकच झाले !
गर्जत गर्जत जातात—
'झपूर्झा गडे ! झपूर्झा !'

[ ४ ]

पेंवच वीरांचें फुटलें !
अकलेचे तारे तुटले !
झाला कोलाहल सारा,
त्यांत पातला सण दसरा !
सीमोल्लंघन,
कलगीगायन,
डंका–वादन,
करित चालले राऊत !
झपूर्झा गडे ! झपूर्झा !

[ ५ ]

'श्रुतिस्मृती आतां विसरा !
हवा कशाला तो कचरा ?
मृतधर्माला ठार करा !
मेलेल्यांवर शस्त्र धरा !'
कलगीवाला,
सच्चा चेला,
बोल बोलला !
फोल ह्मणुनि सारे हंसले !
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

[ ६ ]

पिसें लावुनी काकोल,
दाविल मोराचा डौल;
काकवृंद जरि दिगंतरीं
गर्जुनि तत्कीर्ता पसरी,
परि तच्चित्ता
भुजंग बघतां
कंप तत्त्वतां
सुटे! रूप कळुनी येतें.
झपूर्झा गडे! झपूर्झा!

[ ७ ]

अव्यापारीं व्यापार,
करिल खास तो बुडणार!
दिल्जानांचा बाल असो,
मेलेल्यांचा कुणी नसो!
डंके बडवो!
शिंग वाजवो!
प्रवाह अडवो!
कृष्णाशिलेवरची रेघ!
झपूर्झा! गडे झपूर्झा!

---

## बालकवीचें गायन.

[ चाल—वसंतवाता! बहार केलिस० ]

प्रातःकालीं एके दिवशीं झिमझिम पाउस पडे,
शोभती रानफुलांनीं कडे.

सृष्टीमध्यें नूतन जीवन वाटतसे कीं भरे,
चहुंकडे मोद तदा संचरे!

गार वायुची झुळुक येउनी हिरव्या शेतांवरी,
लोळुनी नाना क्रीडा करी!

बालकवी तों उठला, बसला एकांतीं जाउनी,
जहाला तल्लिन मग गायनीं.

गान ऐकुनी जलधर झाला संतोषित तो मनीं,
दीधलें भान तयें टाकुनी!

मोहित झाल्या हरिणी, बघती कविला निजलोचनीं,
गुंगलीं सरोवरीं कमलिनी !

मानसवासी मराळ असतां हिंडत गगनांतुनी
पडतसे भान न तो राहुनी !

मधुकर रुंजी घालित होता मकरंदा सेवुनी
वाटली लाज तयाला मनीं.

वदला चित्तीं, 'गान न माझें कुणास लावी पिसें,
माधुरी याची त्याला नसे !'

माधव त्याला सांगे, "स्वार्थे पूर्ण तुझें गायन,
कसे मग होतिल वेडे जन ?

बालकवीचें गायन नाहीं स्वार्थयुक्त रे ! मुळीं,
तयाची निर्मळ मानस-कळी.

निस्वार्थी तूं होउनि लावीं तंद्री निज-गायनीं
जनांतें टाकीं मग मोहुनी.'

---

## इंद्रधनुष्यासः--

श्लोक. ज्याच्या योगें मधुरिपु-पदीं नम्र जो वृत्र त्याचें—
शक्रें केलें हनन रणिं, दुष्कीर्ति ही ज्यास लागे,
चापातें ज्या कठिनतरता, लेशही जें द्रवेना,
तें तूंची का असासि रुचिरा ? सत्य हें ? संभवेना ! १

पाहुनी तुजला नाना तरंग उठती मनीं
कल्पना, जल्पना नोहे, जाहली ती तरंगिणी ! २

दिंडी.
क्षणीं वाटे लावण्य काय आलें,
जगींचें तें एकत्र असे झालें
मृदुल तेजस्वी लता तयाची हे
नभीं जाउनी का विराजली आहे ! ३

श्लोक.
क्षणीं गमे सुंदर अप्सरांला,
स्वर्गातुनी भूवरि यावयाला,
सौख्यें विहारास करावयाला,
निर्माण हा सत्पथ काय झाला ! ४

गीती. किंवा स्वर्देवांचें विमान संचार करितसे गगनीं
हें रम्य चित्र त्यावरि नाकींच्या रेखिलें चितार्‍यांनीं ५

दिंडी.
राष्ट्रचित्तावर राज्य जिचें चाले
थोर भूपहि यत्पदीं नम्र झाले
उन्मनीची जी सत्य असे आली
गमे कविता ती प्रकट इथें झाली ! ६

गीती. किंवा नानारत्नें जगतींचीं चतुर विश्वकर्म्यानें-
खचुनी कमान केली ! विश्वप्रासाद शोभला जीनें ! ७

श्लोक. किंवा जी अनुरक्त हो रविवरी, उल्हास जीच्या मनीं,
शोभे जी विमलस्मितें, मिळतसे सन्मान जीतें जनीं,
जी प्रेमें पतिदर्शनीं विकसवी पुष्पांस दिक्सुंदरी
ती या धारण रम्य रत्नजडिता बिंदीस भालीं करी ! ८

उत्प्रेक्षा किति सुंदरा तुजवरी केल्या जरी सुंदरा !
छायाही नच दृश्य त्यांमधिं असे त्वच्चारुतेची जरा !
ब्रह्माण्डें अमितें जयें रचियलीं त्या तूं प्रभूची कृती !
मी तों मानव हीन, तत्कृतिपुढें माझी कृती ही किती ? ९

(इ. स. १९१०)

---

## गुलाबास:--



### पद.

[ चाल—जाते कीं मम शकुंतला ही० ]

डोलसि पवनीं भूषित करुनी कोण्या उद्याना !
दिसतो झाला हर्ष बहूतचि तुझिया पर्णांना !

सत्यासम तूं धरिसि गुलाबा ! अंगीं कांट्यांना !
वर्ण गुलाबी कोठुनि आला सुंदर कुसुमांना ?

गालींचा का देत्या झाल्या गौरवर्ण ललना ?
अथवा झाला रजोगुणचि का वरिता तव सुमनां ?

मधुर गंध हा निववितसे किति रसिक-नासिकांना !
मंदस्मित तव करी सर्वदा मन्मानस-हरणा.

सार्थक झालें पाहुनि तुजला वाटे मम नयनां !
रूपमाधुरी वर्णन करण्या शक्त नसे रसना !

सुगुणें तुझिया येथें पाहें पुष्पांच्या राण्या !
बद्धचि झालों ! सोडुनि आतां तुजसि जाववेना !

(इ. स. १९०९)

# शरत्कालांतील एक सरोवर.

पद.

[ चाल-कळी उमलली जों न पावली० ]

विमलपणा का सर्व जगांचा एक इथें झाला !
सुधाकुंभ वा देवेंद्राचा फुटुनी पाझरला !

किंवा झाला संचित येथें द्रवुनी नगराय !
मधुर चंद्रिका रवि-किरणें वा विरघळुनी जाय !

किंवा पाणी काढुनि विधिनें सर्वहि मोत्यांचें,
मृगबाळांच्या युवतींच्या वा चंचल नेत्रांचें,

भूदेवीला अलंकार हा केला निर्माण;
पाहुनि ज्याला विरक्त जनही डोलविती मान.

किंवा झाला काव्य-रसाचा संचय हा साचा !
असेल अथवा त्रैलोक्यांतिल राशी पुण्यांचा !

वनदेवीचा किंवा पडला मुकुर इथें काय !
कुणा कवीचें अथवा उरलें हें मागें हृदय !

शरत्कालचा दिव्य मनोहर ऐसा कासार,
पाहुनि वाटे विश्व यापुढें ठरेल निःसार !

शैवालानें भरलीं तीरें गमती पाचेचीं;
आंत सुगंधी कमळें फुललीं नाना रंगांचीं;

श्रवणमनोहर चाले रुंजी तेथ मिलिंदांची,
इकडे तिकडे सुखें जोडपीं पोहति हंसांचीं,

पृष्ठीं खंडें कुठें तरंगति मृदुल मृणालांचीं,
चुंबुनि कोठें समीर उठवी जलावरी वीची,

निर्मल माझें मन कासारा ! तुजसम राहूं दे;
आनंदाचा हंस निरंतर तेथें पोहूं दे,

काव्य-लालसा, नीति, नम्रता, हृदयीं नांदूं दे,
जगन्नियंत्याविषयीं प्रेमा अखंड वाहूं दे.

---

## चंद्रास उद्देशून:--

रे कुमुदबांधवा ! नवल वाटतें मातें,
कवि थोर थोरही देति तुला दोषांतें !

जें दोषाकर तें त्याज्य असावें सकलां,
मग मूर्ख काय ते, मानितात जे तुजला ?

जो संसृति-पाशा तोडुनि रानीं बसला,
तो महादेव तुज शीर्षीं घेता झाला.

जो एकचि भासे वीर खरा जगतांत,
तो कामदेवही सखा तुला ह्मणवीत !

काढितां जाहले देवदैत्यही श्रांत,
ती सुधा तुझ्यांतुनि सदा राहिली गळत.

हे लोक लागले सर्व जियेच्या भजनीं,
इंदिरा देवता इंदो ! तव ती भगिनी.

ज्या पाषाणांचें ख्यात कठिण कीं चित्त,
टाकुनी भान ते तुज बघतां द्रवतात !

तो साधु चकोरहि टाकुनि अन्यासक्ती,
हिमकरा ! तुझी रे सदैव करितो भक्ती.

ज्या सकल जगाचें नाक असें कवि वर्णी
त्या तुझिच चारुता वदनीं धरिती रमणी !

रवि अस्ता जातां तिमिर दाटतें लोकीं
त्या तुजविण दुसरा कोण नाशुनी टाकी ?

प्राशितां तमाला डाग तुजवरी पडला,
तुज भूषण तो, जरि कलंक कविजन वदला.

तुज पाहुनि मोदें प्रफुल्ल कुमुदें होती,
तव जयजयकारा मधुप गुंजुनी करिती.

परि सौम्य सदा तूं, क्रुद्ध कदाहि न होसी,
कवि ह्मणुनि जाहले धीट ! निंदिती तुजसी !

जे उग्र, भयंकर, ताप जगाला देती,
त्यां थोर गणावें, हीच जनांची रीती !

(इ. स. १९१२)

## शिशिर--काल.

### दिंडी वृत्त.

असे झाला संप्राप्त शिशिर-काल,
मृदुल-कुसुमां जो होय शुद्ध काल !
गार वारे भूवरी वाहताती,
किरण रविचे नच ताप जनां देती. १

तरुश्रेष्ठहि हे गलितपर्ण झाले !
वनश्रीला म्लानत्व दिसे आलें !
करी पीडा सकलांस शीत पाहीं,
श्रवणिं विहगांचें गान येत नाहीं ! २

रसा ज्यांच्या सेवोनि शरत्कालीं,
मधुर गुंजारव मोदभरें घाली,
रुचिर कमलें तीं सर्वही निमालीं,
ह्मणुनि उद्विग्न भ्रमर-पंक्ति झाली ! ३

सदा ज्यांनीं स्मित-केलि-सदन व्हावें,
गुलाबांच्या कलिकांस लाजवावें !
फुटुनि बालांचे जाति ते कपोल !
दशा ओष्ठांची तीच लाल लाल ! ४

शीत चंद्राचें तेज, तशी धूली;
सर्व उदकेंही शीत पहा ! झालीं.
थिजति सरिता, कासार दूर देशीं,
हिमाच्याही होतात कुठें राशी ! ५

जला करण्या घन, अग्नि, अंशुमाली—
झटति रात्रंदिन, सिद्धि न त्यां आली;
करी लीलेनें शिशिर तेंच कार्य,
ह्मणुनि त्यातें वानोत सर्व आर्य ! ६

---

## वसंत--काल.

### शार्दूलविक्रीडितवृत्त.

आला संप्रति हा वसंत, ऋतुंचा राजा जया बोलती;
उद्यानें खुलती, कळ्या उमलती, गंधाप्रती सोडिती;
वायू मंद गती भ्रमे, वसुमती आनंदली ही किती !
गाती पक्षिततती, विहार करिती, पुष्पासवा प्राशिती. १

आम्रांना नव मंजिऱ्या खुलविती, गाती तिथें कोकिल,
गुड् गुड् गुड् करुनी अहा ! रमतसे पुष्पीं अलींचें कुल;
हातीं घेउनि पुष्पहार, लतिका वृक्षाश्रयें राहिली,
अर्पाया ऋतुराजयाप्रति तया उत्कंठिता जाहली ! २

प्रेमानें लतिकांस नृत्य शिकवी, पर्णावली हालवी,
केन्हां कंपित जो सरिज्जल करी, तापा दुरी घालवी,
पुष्पांच्या दुरि नेउनी परिमळा भृंगांस मोहें भरी !
तो मंदानिल हा सुखें विहरतो आहे पहा ! भूवरी. ३

कोठें ही तरुराजि डोलत असे, कोठें दिसे निर्झर,
पुष्पांचा मृदु गालिचा करितसे ज्याचीं तटें सुंदर;
गानातें करिती शकुंत बसुनी कोठें कपि क्रीडती,
कोठें नर्तन ते मयूर करिती, ज्यांची सहर्षा मती, ४

कासारीं तटिनी-जलीं विहरती स्वेच्छें बकांच्या तती,
पुष्पें वेंचुनि आणण्या उपवनीं बाळें त्वरें चालती !
कोणी गात वनांत जाउनि तिथें नाना फलां भक्षिती
सृष्टीच्या अवलोकनीं अतिशयें गुंगे कुणाची मती. ५

रात्रीं वर्षत औषधींवर सुधा, येई यदा चंद्रमा,
नाना सौख्यविलास इष्ट गमती कोणा कवींच्या मना.
मी तों स्वैरपणें तदा भटकतों रानीं पिशाच्चापरी !
माझ्या अल्प मतीस लेश न कळे वृत्ती कुणाची बरी ! ६

(इ. स. १९११)

---

## स्फुट ( अतिपरिचय. )

अतिपरिचयें अवज्ञा, संततगमनें घडे अनादर कीं,
मलय-नगीं भिल्लस्त्री चंदनकाष्ठांस पावकीं टाकी ! १

[ भाषांतर ]

# ग्रीष्म-काल.

मंदाक्रांता.

गेलीं ! गेलीं मृदुल कुसुमें, वायुही उष्ण वाहे,
केलें गाना मधुरतरशा तो झरा कोठ आहे ?
देई तापा बहुत रविचें भूतला रश्मिजाल,
सांगे सर्वां धरणिवरतीं नादतो ग्रीष्म-काल. १

हातीं घेती व्यजन जन हे ताप वारावयातें,
कोणी जाती उपवनिं तिथें शांत तच्चित्त होतें.
सर्वांच्याही तनुंतुनि सदा चालती घर्म-धारा
कारंजाचा सुखवित असे शीत कोणा फवारा. २

वाहोनीयां सुमधुर फलें आम्र हे नम्र झाले !
येतांही श्री सदनिं विनयें थोर तो नित्य चाले.
स्वैर क्रीडा करिति कपि हे वृक्ष-शाखीं बसून,
बालां देती कुतुहल वहू वांकुल्या दाखवून. ३

"जातां कोठें" वदत जननी "एवढ्या ह्या दुपारीं ?
या ! या मागें लवकर कसे ! ऊन लागेल भारी !"
'नाहीं आई ! खचितचि अह्मी बैसतों सांवलीला.'
आश्वासोनी तिजसि निघती बालकें खेळण्याला. ४

कोठें धूली वरि उडतसे म्लानता ये दिशांस,
कोठें कोठें मृगजल दिसे, मोहितें जें मृगांस.
होई उष्मा हिमकर जरी दर्शना देत रात्रीं,
झाली ! झाली तृषित बहु ही ग्रीष्मतापें धरित्री !५

येतां वर्षा, सुख सकलिकां मेघ देती अपार,
नाहीं ! नाहीं ! किमपिहि परी ग्रीष्म नाहीं असार !

'दुःखा अंतीं सुख' तरि कळे सत्य तें मोल त्याचें,
वृक्षच्छाया दिनकर-करें तप्त त्या सौख्यदा ते. ६

(इ. स. १९१२)

## कारंजें.

[ भूपती खरें तें वैभव सुख० या चालीवर. ]

हें सुंदरतेचें निर्मलतेचें सदन !
हें आनंदाचें वाटे क्रीडा-भवन !
यामुळें सर्वही शोभतसे उद्यान,
या कारंजातें देखुनि हरपे भान !
वरि उंच किती उडताती—सीकर,
ते तापातें हरिताती—सत्वर;
त्यां सेवुनि हर्षित होती—तरुवर,
रवि-किरणीं येती रंग तयांतें नाना,
मग इंद्रधनुष्यचि दिसे तिथें सर्वांना ! १

कौमुदी रसानें हिमकर न्हाऊं घाली—
सृष्टीस तेधवां यासहि शोभा आली.
जल-बिंदु तयांतुनि उडुनी पडती खालीं
तत्परंपरा त्या मोत्यांच्या जणु ओळी !
झटतसे उंच जायाला—हें वरी,
तत्प्रयत्न सफल न झाला—जरि तरी-
नच दुःख लेशही त्याला—अंतरीं !
आनंद-मग्न त्या ठावा नच विश्राम !
करि उन्नतिसाठीं सदा आपुल्या यत्न. २

# वर्षा--काल.

श्लोक. बर्हे ज्याच्या विलसति शिरीं भासती इंद्र-चाप,
कांति श्यामा भ्रमवि मतिला कीं असे हा पयोद!
तेणें नाचे प्रमुदित शिखी, त्यासवें गोप-बाल,
स्वीकारो तो प्रणति मम ही श्रीहरी मेघनील!' १

* * * *

निदाघीं तापानें व्यथित बहु झाली वसुमती,
'प्रभो! रक्षा!' प्रार्थी करुण मघव्याला मग सती;
द्रवे चित्तीं, प्रेषी सुरपति सुवेगें घनतती;
*कुणाची थोराशीं करुनि विफला होय विनती? २

लीलोल्लासें जलद अवघे जाहले कामरूप,
सिंहाकारें गिरिवरि किती गर्जताती उमोप!
वप्रक्रीडा-प्रिय गजचि हे येति शैल-प्रपातीं,
ऐशी केव्हां नभिं विहरतां शोभते मेघ-राजी! ३

सुपर्णाकारातें धरुनि किति उड्डाण करिती!
किती व्यालाकारें पसरुनि मुखा स्तब्ध बसती!
किती काकाकारें करिति नभ हें क्षुब्ध कलहें,
असे नानाकारें विहरति पहा! मत्त घन हे! ४

दावी चंचलता, तशी चपलता, घेई सदा वक्रता,
मेघाची वनिता, दिसे जणुं लता, अंगांत तेजस्विता;
होई क्रुद्ध तदा करी प्रलय जी, रूपें मनोहारिणी!
आनंदें गगनीं पहा! फिरतसे ती धन्य सौदामिनी. ५

करुनि कितिक नौका सागरामाजि मग्न,
प्रबल अनिल लोकीं भासला मूर्त विघ्न;

* केषां न स्यादभिमतफला प्रार्थना ह्युत्तमेषु?
—मेघदूत. ( क्षेप श्लोक. )

श्लोक. निजशिरिं जवशाली घेउनी मेघमाला
करित विजय-घोषा चालला उत्तरेला. ६

'सों सों' शब्द करी; भयें किति किरी जाती पळोनी दुरी,
झाला क्षुब्ध हरी, त्यजी गिरि-दरी गर्जोनि रोषोत्करीं;
ये वेगें शिखरीं, बघे निज-अरी, जो ने तया अंबरीं,
त्या देखोनि वरी प्रमत्तहि करी गेले अरण्यांतरीं! ७

शाखा ज्यांच्या गगन अवघें शोषण्या उंच जाती,
प्रावृट्कालीं जवन पवनें वृक्ष ते भग्न होती!
कंठाश्लेषें करिति लतिका यत्न त्यां सांवराया!
साध्वी ज्या ज्या, झटति पतिच्या संकटा त्या हराया.८

हे येथुनी बक अहा! गगनीं उडाले!
हे कर्क हर्ष-जलधींत गमे बुडाले!
शीतोदकें भिजविते बहु मेघमाला,
वृक्षाश्रया म्हणुनि सत्वर धेनु आल्या. ९

तोयोत्सर्ग करून भूमिवरतीं, तापाप्रती घालवी,
नाना औषधि, बाल-वृक्ष, लतिका तोयेंच कीं वाढवी;
क्षेत्रें सुंदर शिंपुनी बहुत दे जी धान्य-संपत्तिला,
प्रेमें पाहति ती कृषीवल-वधू कादंबिनी श्यामला. १०

कुरळ कुंतल येति मुखावरी,
विलसती वनिचींच सुमें शिरीं!
वदन वासुनि निश्चल राहती,
नयन विस्तृतही नच हालती! ११

बैसून शैलशिखरीं वर पाहतात,
सोत्कंठचित्त घनगर्जित ऐकतात;
हर्षे उभारुनि पहा! अपुले पिसारे,
तालें कसे करिती नर्तन मोर सारे! १२

श्लोक. “चालो श्रेष्ठ मयूर हो ! गिरिवरी हें आपुलें नर्तन,
तैसें आळवितां घनास तुमचें तादात्म्य पावो मन !
पुष्पांचा नव गुच्छ तेविं सुरसें जी नित्य ओथंबली,
सेवाया श्रवणांस या मम मिळो ती दीव्य केकावली!” १३

‘ ड्रॉंव् ड्रॉंव् ड्रॉंव् ड्रॉंव् ड्रुरु ड्रुरु टरॉंव् !’ प्रार्थिलें दर्दुरांनीं,
गेला त्यांचा करुण रव तो तत्क्षणीं मेघ-कर्णीं;
वारिस्रावें जलधर करी शांत मंडूक-जीव,
दाता नेणे वर अधम हा याचकीं भेदभाव. १४

ऐकोनी घन-गर्जना शिशु-मनीं भीती बहू वाटते,
‘म्हातारी भरडी चणे !’ परिसतां तत्काल ती आटते !
देखोनी रजतासमान धवला धारा जलाच्या मुलें
ध्याया धांवति अंगणीं, भिजविती अंगें सदा कोमळें !१५

नाना रत्नमणी खचून विधिनें सोपानमाला बरी,
हे केली उतरावयास अमरां स्वर्गांतुनी भूवरीं;
किंवा बिंदिच ही धरी निजशिरीं वाटे दिशा सुंदरी,
ऐसें इंद्रधनुष्य चारु विलसे केव्हां घनांगावरी. १६

“ सौंदर्याचें सदन गमसी निश्चयें इंद्र-चापा !
नोहे व्योमीं तुजसि परि रे ! शाश्वती लेश बापा !
हृत्पात्रीं या मम तरि तुझें सांठलें रूप जाण,
*आनंदाची, चिर समय जें रम्य तें, सत्य खाण !” १७

दिंडी. निशा-कालीं नाचती अंतराळीं,
ज्योतिरिंगण करितात विविध केली !
मेघमालांतों स्वर्ग-तारकाली
विहाराया पातली काय खालीं ! १८

---

* A thing of beauty is a joy for ever.
—KEATS, *Endymion.*

दिंडी. करी रात्रीला कृष्ण अंधकार,
सायकाची गति घेतसे समीर !
निघे रानांतुनि शब्द जंबुकांचा,
नदींतीरीं संतुष्ट दर्दुरांचा ! १९

श्लोक. हें कृष्ण सर्व भुवनीं भरलें अपार,
भूमीवरी करिति कृष्ण जनें विहार !
बिंबाधरा-निटिलशी नभिं चंद्रकोर—
अभ्रावृता ह्मणुनि खेद करी चकोर ! २०

"कांहीं विवेक धर गा ! चतुरा चकोरा !
शोभे न खेद तुझियासम जाण थोरां !
जो संकटीं त्यजुनि धैर्य वदेल 'हाय'
गातील सादर तयास कवींद्र काय ? २१

धैर्यें प्रिया-विरह सोशित चक्रवाक
मित्रा ! सरित्तटिं असे बसला विलोक !
कोणास संतत अशी जडली विपत्ती ?
जातील हेहि दिन जाणुनि टाक खंती." २२

✱ ✱ ✱

कोठें तृणें हरित शोभविती धरेला,
कोठें विचित्र कुसुमें वन-वल्लरींला;
हे शैलभाग अवघे भरले फुलांनीं
लक्ष्मीच मूर्त उतरे जणुं काय रानीं ! २३

वनस्पति नव्या कितीं उगवल्या पहा ! भूवरी,
वनांत वनदेवता प्रमुदिता विहारा करी !
कुठें मधुर गायना करित धांवताती झरें,
कुठें गिरि-दरी-तलीं जल शिळेंतुनी पाझरे. २४

श्लोक.

हे चालले खळखळाट करीत नाले,
झालें अधःपतनही तरि घोष चाले !
'देऊं भया' वदति 'अब्धिस गर्जनेनें' (!)
जे नीच ते फुगति अल्पहि वैभवानें. २५

ज्यांचीं तीरें वसंतीं कुसुम–परिमलें नंदनें भासवीलीं,
केली क्रौंचद्विजांनीं विमलतरजलीं ज्यांचिया स्वैर केली;
वर्षोनी पुष्परेणु प्रमुदित तरुंनीं पूजिल्या ज्या अखंड,
झाल्या त्या सर्व आतां कलुषित सरिता, शब्द ज्यांचा प्रचंड ! २६

चालल्या सागरापाशीं रोषें घोषें अति त्वरें
मोडिती वृक्ष जे त्यांशीं वागले नच आदरें. २७

गेले वृक्ष शिला तैशा, लव्हाळे परि वांचती !
'व्हा नम्र प्रबलीं' ऐसें तत्त्व सर्वांस सांगती. २८

प्राशुनी मेघवारींतें फुलती पारिजातक,
वात ने वाहुनी त्यांचा गंध जो चित्त–हारक. २९

"हे अंगने ! मन तुझें गुरु कोमलांचा,
कोणी वदो ! परि न सत्य तदीय वाचा !
कीं त्वन्मनासमचि कोमल जीं पहा तीं
झालीं प्रफुल्लित सुमें तरु–पारिजातीं !" ३०

क्रोधें ज्याचा होय आरक्तवर्ण,
पृष्ठीं लाटा येति शैलासमान !
गर्जे रोषें, जाहलें रूप रौद्र,
वर्षाकालीं शोभतो तो समुद्र. ३१

"बा सागरा ! कर असाच सदैव घोष,
होवो तयें निशिदिनीं कविलागिं तोष.
लाटा तुझ्या करुत कृष्णशिलांस भग्न,
दाही दिशांस उधळोत तदीय चूर्ण !" ३२

श्लोक. यावच्चंद्र-दिवाकरौ जलनिधे ! लीलांस तूं चालवीं,
प्रलयदीं घनमालिके ! निज-जलस्रावें धरा शांतवीं !
'सों सों' शब्द सवेग वाहुनि नभीं झंझानिला ! तूं कर,
फूत्कारोनि समस्त नाग तुजला देवोत गा उत्तर ! ३३

प्रमत्त शितिकंठ हो ! करुनियां सदा गर्जना,
निनादित करीत जा गिरिदऱ्यां तसें कानना !
नभांत जलदासवें कर विहार विद्युल्लते !
वदोत जन तोषुनी सकल धन्य वर्षर्तुतें ! ३४

* * * *

चित्तें ज्यांचीं सुम-परिमलें मोहुनी पूर्ण जाती,
धांवोनी जे मधुर-सुरस-प्राशनीं दंग होती,
डोले मोदें वनहि मग यन्मंजु-गुंजारवानें,
त्या रंत्यांना सुमन नव हें अर्पितों आदरानें. ३५

(इ. स. १९१३.)

# भगवान् कर्दमाला दर्शन देतात.

[ पुढील उतारा कर्दम–देवहुती आख्यानांतील असून तो भागवतांतील श्लोकांच्या आधारानें रचलेला आहे. कथेकऱ्यांसाठीं ह्मणून तयार केलेला असून शिवाय तो विद्यार्थी-दशेंतच लिहिला गेल्यामुळें त्याची रचना बरीच चमत्कारिक झालेली आहे. कथानकाचा पूर्व संबंध येणेंप्रमाणें आहेः—सत्ययुग चालू असतां प्रजेची वाढ पूर्णपणें झालेली नव्हती. ती होणें ब्रह्मदेवास इष्ट वाटल्यावरून त्यानें प्रजापतींपैकीं कर्दम नामक ऋषीला प्रजा निर्माण करण्यास आज्ञा केली. तेव्हां तो अनुरूप पत्नी प्राप्त व्हावी ह्मणून बिंदुसरोवराजवळ सरस्वती नदीच्या कांठीं तपश्चर्या करूं लागला. सांख्य शास्त्र निर्माण करणारे कपिल मुनि या कर्दमाचेच चिरंजीव होत अशी समजूत आहे. ]

श्लोक.

लावी समाधि, मुनि आचरि सत्क्रियेतें,
'जे भक्तिपूर्ण हरि–दर्शन त्यांस होतें;'
जाणून हें निशिदिनीं प्रभु–पाद चिंती.
श्रीवल्लभाविण न कांहिं तदीय चित्तीं. १

झाले दशसहस्राब्द, तपस्या फार जाहली,
पुष्कराक्ष–प्रभूमूर्ती तोषुनी तेथ पातली. २

पक्षींद्रारूढ विष्णुप्रति पुढतिं तदा पाहुनी विप्र धाला,
रूपें श्रीकांत *तेव्हां धवलतर, गळां कैरवांच्या सुमाळा !
कांतीनें भासतोहे प्रतितरणि जणो, वक्त्र हास्यें विराजे,
नीलां वक्रालकांतें अलिहि बघुनियां मानसीं फार लाजे ! ३

वक्षाप्रती शोभवि देवि पद्मा,
हस्तीं धरी देव सलील पद्मा;
शंखारि–कौमोदकि–खड्ग–धारी,
भक्तांस यद्दर्शन मोदकारी ! ४

---

* सत्य युगांत.

श्लोक. घर्मावली शोभति भव्य भालीं,
दावी गळां कौस्तुभ तो झळाळी !
किरीट शीर्षी प्रभुच्या विराजे,
कर्णामधीं कुंडल दिव्य साजे. ५

रुचिर मूर्ति अशी अवलोकुनी,
वदत 'लब्धमनोरथ मी' मुनी;
नयनमार्गि सुखाश्रुहि पातलें,
हृदय भक्तिरसें बहु दाटलें. ६

नमस्कारी देवा मानिं विमलभावा धरुनियां,
वदे, "ईशा ! आलां करुनि बहु दीनावर दया !
गमे सोन्याचा हा दिवस, सफला दृष्टि मम ही !
प्रभो युष्मद्देहीं *प्रथम गुण राहे सकलही. ७

योगभ्रष्ट मनुष्य होउनि शुचि-श्रीमद्गृहीं जन्मतो,
युष्मद्दर्शन योग साध्य करुनी कष्टें महा साधितो
जन्में एकचि आज तें प्रभुवरा ! मातें परी लाधलें,
येणें भाग्य मदीय सत्य उदया भासे मला पावलें ! ८

पादारविंद अपुलें भवसिंधु-नाव,
स्त्रीपुत्रभोग उपभोगिति तेथ जीव,
क्षुद्रांसही मिळति ते, परि ते मिळाया
मोही नरांप्रति विभो ! अपुलीच माया ! ९

अनंत जगतां विनिर्मुनि, तयां प्रभो ! शासितां,
अगाध महिमा असा कविहि भागले वर्णितां;
वदान्य-गुरु जाहलां स्वपद देउनी याचकां !
न याल मग त्या नरांप्रति अभीष्ट ते भोग कां ? १०

---

* सत्त्व गुण.

श्लोक. सकाम नर निंदिले, परि सकाम मीहीं असें !
भवच्चरणगामि जो नर न तोचि कार्यीं फसे;
जनां गमति आपुलीं अमर–वृक्षशीं पावलें,
कलत्र मज योग्य द्या, मग अभीष्ट तें पावलें ! ११

समानशीला, चतुरा, प्रियंवदा,
कुलीन कांता मज द्या अधोक्षजा !
तिच्यामुळें ते पुरुषार्थ तीनही—
मिळोत इच्छा पुरवा रमेश ! ही. १२

निष्कामोपासना योग्य, तीतें न परि योग्य मी,
लोक सारे काम–हत, जरी ते तव पालनीं. १३

मीहीं एक तयांतील, कर्मे त्यांसम आचरीं !
तीं कर्मे पूर्ण होण्यातें पत्नीच्छा मानसीं धरीं. १४

दिंडी. कालचक्राची असे अह्मा भीती,
भक्त तुमचे जे ते न तया भीती.
कथा–मद्याचें पान जे करीती,
मनीं विस्मृति त्यां होतसे भवाची ! १५

गीती. रस, गंध, रूप, शब्द, स्पर्श विभो ! भक्त जे तयां देतां,
अप्रिय तें तुह्मांला, देणें प्रिय मोक्ष आपुल्या भक्तां. १६

द्यावीं तथापि मजला विषयसुखें, सेवुनी तयां देवा !
सुर-पितृ-मानव यांच्या ऋणांतुनी मुक्त होय मी, पावा. १७

ऋणमुक्त जाहल्यावरि लाभो मज मोक्ष ही पदीं विनती,
देतां भुक्ति जनांतें, मुक्ति तशी त्या प्रभो ! तुह्मा प्रणती." १८

श्लोक. वदोनी असें राहिला स्तब्ध विप्र,
मुखा पाहतोहे प्रभूच्या पवित्र,
स्मित, प्रेम तद्दर्शनीं दृश्य होतीं,
रमानायकाची असे शांत मूर्ती. १९

श्लोक. अमृततुल्य गिरा प्रभु बोलला,
'द्विजवरा ! तव भाव कळे मला;
नियम त्यास्तव तूं धरिले किती,
सतत मद्भजनीं रमली मती ! २०

सामान्य लोक जरि भाव धरून चित्तीं,
आराधिती मज मुने ! तरि सार्थ होती;
तूं तों प्रजापति ! मला प्रिय फार होसी
मीं योजिली तुज वधू अनुरूप ऐशी. २१

ब्रम्ह्याचा सुत, राजभूषण, मनु, ज्ञाता, गुणें आगळा,
शौर्यें मंडित, सार्वभौमनृपतिश्री माळ घाली गळां,
ब्रह्मावर्तिं निवास तो करुनियां पृथ्वीस पाळीतसे,
केलीं सर्वहि इंद्रियें वश जयें ऐसा महात्मा असे. २२

गीती. शतरूपामहिषीसह परवां येईल तो इथें राजा—
त्वद्दर्शनार्थ, दुहिता त्याचीं मीं तुज नियोजिली भाजा. २३

श्लोक. रूपें रती, तनुलता मृदु फार आहे,
नेत्रें विलोल, अलिकांति तयांत राहे.
पीतांगि, चंद्रवदना तशि कुंददंती
वक्रालका, गुणवती प्रियभाषिणी ती. २४

नांदाल वर्षें जगतीं अनेक,
त्यागाल केव्हां नच तो विवेक.
कन्या नऊ होतिल सत्त्वशील,
निष्पापशा, त्यां जन वानितील. २५

गीती. त्यांतें भार्या करुनी, उदरीं स्वस्थापनेस करितील—
सन्मुनि, जगतीं येणें ब्रह्मोचित मनुजवृद्धि होईल. २६

त्वत्पत्नी देवहुती, तदुदरिं अवतीर्ण होय मी पुढतीं—
कपिलमुनी या नामें, निर्माया तत्त्वसंहिता जगतीं. २७

श्लोक. कामासक्त न हो कदा मन तुझें, त्यातें विवेकें गुणें—
ठेवीं बद्ध करोनि, मद्रतिसुखा केंव्हां न बा ! टाकणें.
कर्मी आचरणें, फलावरि परी आशा न तूं ठेवणें,
कर्मांचीं मिळती फळें तुज तयां माझ्या पदीं अर्पिणें. २८

दिंडी. सकल जीवांशीं करुण हृदय होणें,
पुढें संन्यासें अभय तयां देणें;
चित्त तूझें संतुष्ट–होय येणें,
शेवटीं बा ! मग शरण मला येणें.' २९

श्लोक. गात्रें अंतर्मुखें तीं करुनि सकलही ध्यान जेव्हां करावें,
तेव्हां कोठें जनाला नयनसुखद तें रूप ज्याचें दिसावें,
गेला वैकुंठलोकीं जगदघहर तो बिंदु–तीरावरोनी;
विप्राचा कंठ दाटे, किमपि न वदवे, नेत्र आले भरोनी. ३०

दिंडी. वैनतेयाचे पक्ष करिति घोष—
*सामवेदाचा, हर्षुनी उमोप;
बिंदुकासारीं स्वस्थ मुनी राहे,
मनु स्वायंभुव येइ कदा पाहे. ३१

(इ० स० १९११)

## स्फुट.

गीती. शैलीं शैलीं माणिक न मिळे, मुक्ता गजीं गजीं नाहीं,
चंदन वनीं वनीं नच लभ्य न सर्वत्र साधुजन तेही. १

सदनीं विपिनीं अथवा हरिणाक्षींच्या सुरम्य हारींही–
मणि तुल्य–मूल्य राहे; उसनी तेजस्विता तया नाहीं. २

[ भाषांतर ]

*गरुडाचे पंख सामवेदस्वरूपी आहेत असें मानिलें आहे.

# सूर्योदय.

## श्लोक.

गेली ती रजनी, प्रभावितरणीं उल्हास ज्याला मनीं,
तो हा ये गगनीं अहा! दिनमणी, संगें उषा भामिनी.
आनंदे अवनी, विकास सुमनीं, म्लानत्व तारागणीं,
भारद्वाज झणीं रवीस नमुनी संतोषवी गायनीं. १

उषःकालीं प्राची अरुण-किरणीं लोहित दिसे,
द्युलोकींची कन्या दिनकरसखी तोंचि विलसे!
कराग्रांनीं जो कीं तिमिर-गज-गंडस्थल चिरी
प्रतापी तो आला गिरिवरि पहा! भास्कर-हरी. २

मार्गीं वाटे गळुन पडलीं म्लान तारा-प्रसूनें,
चूडापाशस्थलिं वसविलें ज्यां निशा सुंदरीनें,
त्यांतें वेगें किरण रविचे झाडुनी टाकिताती!
सर्वां आशां विमलवदना स्निग्धभावें करीती. ३

झाले सुखी हे द्विज चक्रवाक,
पद्मांतुनी भृंगहि होति मुक्त!
पुष्पांप्रती वेंचुनि आणण्याला
हे चालले बालक, आणि बाला. ४

कल्याणकारी अवघ्या जगाचा,
भासे खरा मित्रचि उद्यमाचा.
आधार ज्याचा ग्रहमालिकेला,
वंदूं चला! त्या रविराजयाला. ५

# चहा–गीत !

[ १ ]

चहा ! तुझे गुण वर्णन करितां कुंठे कविवर-मती
मूढ हा माधव मग रे किती ?

इहलोकींची सुधा सत्य तूं ! दुर्लभ देवांसही !
तुजमुळें धन्य जाहली मही !

सुरासुरांनीं सागर मथिला सर्वच बेटे खुळे !
तुझी त्यां किंमत लवहि न कळे;

रत्नें चौदा मात्र काढिलीं ! उत्तम तें राहिलें !
सुदैवें आह्मांला लाधलें.

तुज न आणितां सीतादेवी दशाननें आणिली,
ह्मणोनी राक्षस पडले बळी !

तुझि न कौरवां ! परि राज्याची तृषा बहु लागली !
कुळाची रांगोळी जाहली !

जें सुरासुरांना लब्ध जाहलें नसे,
जें प्राप्य न ह्मणुनी किन्नर होती पिसे,
ज्यामुळें कलियुगा महत्त्व आलें असें,

तें पान तुझें गा ! मनुज करीना जरी !
व्यर्थ तो व्यर्थ जन्मला तरी !

[ २ ]

'काव्य कवींचें' कुणी बोलती 'अमृताला लाजवी'
तुझी परि नेणति ते थोरवी !

खचित सांगतों एकाही नच काव्यीं तव माधुरी !
लोक ते भकती कांहीं तरी.

सत्प्रीतीची छटा कवींना युवति-कपोलीं दिसे,
खरोखर तेथें परि ती नसे !

तुझ्याच ठायीं रम्य रक्तिमा दावी सत्प्रीतिला,
ह्मणोनी सेविति युवती तुला !

मन्मथदेवा 'वीरशिरोमणि' बोलो कामी जन,
चालवो तद्गुणगण—गायन,

शृंगाराचे सडे घरोघर घालो कविभूषण
करूं द्या मदन तिथें नर्तन;

परि मीनकेतना बहुतांनीं जिंकिलें;
सक्रोध होउनी शिवें जया जाळिलें,
मग अनंग ऐसें नाम जया लाधलें,

तो वीर कशाचा ? चहा ! वीर तूं खरा !
सकलिकां तुझाचि गा ! आसरा.

[ ३ ]

होटेलांनों ! चहारसाच्या वर्षावाला करा,
न्हाउंया त्यांत एकदां धरा,

नव्या मतांचे राव ! पुढें या आवेशानें जरा,
चहाच्या जयजयकारा करा !

दिल्जानांच्या शूर मुलांनों ! डंके हातीं धरा,
चहाच्या करा कीर्ति-विस्तरा !

नव्या कवींनों ! प्रचंड ऐसें काव्य चहावर करा,
लाजवा पूर्वीच्या कविवरां !

गृहदेवींनों ! चहावरी या मंगलगीतें ह्मणा !
सदोदित चहागीत गुणगुणा !

देवगृहीं त्या स्थापुनि उच्च स्थानीं नेमें पुजा,
हवीतर इतरांना द्या रजा !

या अखिल जगाला वेड लागलें पहा,
जाहली जयाची सर्वहि लोकीं चहा,
तो देव-कोटिंतिल कोण ह्मणेना चहा ?

या ! चहाभक्त हो ! चहांत गुंगा सदा !
शेवटीं जाल मुक्तिच्या पदा !

( इ. स. १९१४ )

---

## स्वारीची शिकार !

श्लोक.

" रवीवार उद्यां, सुटीचाच वार,
करावे धडे ते उद्यांची तयार.
चला जाउं आतां फिरायास रानीं ! "
निघालीं मुलें सत्वरी हें ह्मणोनी. १

कोणीं जोडा घातलासे पुणेरी,
कोणी जातां मारितोहे लकेरी !
झाडां हाणी काठि घेवोनि कोणी !
स्वच्छंदानें हिंडती बाळ रानीं. २

कोणी घाली शीळ, जी गोड वाटे,
ऐकोनीयां मानसीं मोद दाटे;
गोळा केलें कोणिं रानीं फुलांतें
कोणी धोंडे मारितो वानरांतें ! ३

श्लोक. वडाची पारंबी धरुनि कुणि झोंके बहुत घे !
फळें आणायाला दुरुनि वनिंचीं त्या कुणि निघे;
कुणी धोंडे टाकी नदिंत, बघतो ठावचि तिचा !
कुणी सांगे मित्रां बहु सुरस गोष्टी गमतिच्या. ४

फळें आणण्याला विनू दूर गेला,
निंबाच्यावरी पाहता खार झाला;
वदे तो तिला, ' दे मला नींव कांहीं ! '
न दे लक्ष ती त्याकडे ! नींव खाई ! ५

विनवुनी तिज भारी शेवटीं त्रास पावे,
वदत मनिं तदा तो मस्त ही फार आहे !
कळवुनि मम मित्रां सूड घेईन हीचा
मजपुढतिं न चाले डौल थोडा कुणाचा !' ६

मित्रांपाशीं सांगण्याला निघाला,
घाईनें तो बोलला काय त्यांलाः-
"पाहीयेली खार मी एक रानीं
जाऊं या हो ! आणण्या ती धरोनी ! ७

तिची शेंपटी तोडुनी सोडुं तीतें।
बुकामाजि ठेवूं तया शेंपटीतें !
गड्यांनों ! चला साधण्याला शिकार !
नका वेळ लावूं ! त्वरें व्हा तयार ! " ८

स्फुरति सकल बाहू ! नेत्रही लाल झाले !
सकल हृदयिं तेव्हां एक आवेश खेळे !
सकलहि शिशु काठ्या घेऊनी सज्ज झाले !
तरुवरि बसली ती खार तेथें निघाले ! ९

जलद जलद चाले सर्व ती बाल-सेना,
तिजपुढतिं कुणीही जावयाला धजेना !

करिति विविध शब्दां, फार गोंगाट झाला
प्रतिरवहि तयाचा सर्व रानीं निघाला ! १०

गीती. 'चिव चिव' शब्द करोनी चिंचेवर खार ती उडी घाली,
चिंचेवरुनी बकुळीवरि, तेथुनि आम्रतरुवरी आली. ११

श्लोक. बाळें तीच्या पाठलागा करिती
झाडींतूनी व्यर्थ तीं धांव घेती !
कोणी मागें राहिला बोलतोहे —
' थांबा ! मागें मी पहा राहिलों हें !' १२

कांटे झाडें ओढितातो कुणातें,
कांहीं काळें सोडितातो तयांतें;
कोणा पायीं बोंचती फार कांटे,
कोणाचा तों कोट सद्राच फाटे. १३

कुणा धांवतां धांवतां ठेंच लागे !
पडे कोणि ओढ्यांत जातां न मागें !
कुणी बोलताती " नको ही शिकार !
घरीं खास आह्मां बसे आज मार ! " १४

उडे असा गोंधळ बाळ-सैन्यीं,
नसे तयांच्या मुळिं वाण दैन्यीं !
ती खार केव्हांच पळे घरास !
सांगे कथा ही अपुल्या पिलांस. १५

(इ० स० १९११.)



# तात्या पंतोजी.

गांवामध्यें जुनें पुराणें देउळ गणपतिचें;
सुबक बांधणी, खांबावरतीं कामहि नकशीचें,

द्वारीं ज्याच्या विहीर, चांफा, भोंवतिं तरुराजी,
त्यांतच बसला शाळा घालुनि तात्यापंतोजी.

विद्येची गणराज देवता, ह्मणुनी ही शाळा—
घालुनि तेथें संमत साऱ्यां पंतोजी झाला!

मुद्रा त्याची रागिट, तैशी कपाळास आंठी,
गंध दुबोटी लावी; हातीं निगडीची काठी.

पागोट्यानें उणीव केली छत्रीची दूर,
पाहुनि त्याला मनीं लाजतो चाकाचा घेर!

तपकीरीची डबी सदाही कनवटिला त्याच्या,
तमाखुचूर्णें लाल जाहल्या नाकपुड्या साऱ्या!

चिलीम वाटे पंतोजीच्या पत्नीला सवत,
फेंकुनि देई तीन तीनदां, परि ती ये आंत!

वर्षें झालीं वीस, परि नवी चंची नच आली!
पुराणवस्तुप्रियता येणें सकलांना पटली!

शिष्य तयाचे हुषार मोठे, घोडीवर चढती!
कुणी ओणवे! कोणी खुर्ची रोज रोज घेती!

कोणीं भाजी फळें गुरूच्या घरीं पोंचवावीं,
कुणीं सुपाऱ्या, पानें देउनि मर्जी राखावी.

पंतोजींना ज्योतिष येतें प्रश्न पहातात,
वस्तु हरपली कोठें आहे अचुक सांगतात!

गमना तैसें घरें बांधण्या मुहूर्त बघतात,
उत्सवसमयीं मौजेखातर कथाहि करितात !

*वेदांतहि त्यां कळतो सारा, वादविवादांत—
त्यांच्यापुढतीं शास्त्री मोठे टेंकितात हात !

आंगावरतीं बाजू येतां संतापुनि जाती,
गुरुजी अपुल्या तरी मतांच्या समर्थना करिती !

विद्वत्तेचे द्योतक ऐसे शब्द थोर थोर—
चिडुनी वदतां पंतोजींना कंप सुटे फार !

मेघासम गर्जना ऐकुनी टकमक जन बघती,
" शिरीं एवढ्या अपार भरलें ज्ञान कसें ! " वदती.

[ इ० स० १९१२ ]

---

## स्फुट. ( गीती )

ज्यांच्या बाणें किंवा कवनें शिर हृदय होय न पराचें—
दूर तरी ते धन्वी किंवा कवि काय होत कामाचे ? १

* * *

केलीं नयनमनोहर कांचन-कमलें सुवर्णकारानें
तरि गंधयुक्त त्यांतें करणें विधिमात्र एक तें जाणें २

[ भाषांतर. ]

---

* " In arguing ,too the parson owned his skill,
For, even thongh vanquished, he could argue still;
While words of learned length and thundering sound
Amazed the gazing rustics ranged around;
And still they gazed, and still the wonder grew,
That one small head could carry all he knew."

—GOLDSMITH, *Deserted Village.*

११०

# गोपूकाका !

[ १ ]

हिरवी हिरवी शोभे झाडी ओढ्याच्या कांठीं,
नाराळि पोफाळि यांची तींतच बाग दिसे मोठी;

वाहे झुळ झुळ जिकडे तिकडे पाटाचें पाणी,
तिच्यांत होती ' *मठी ' बांधिली **गो**पूकाकानीं.

ओळख त्यांची करुनी घ्याया असतिल जे राजी,
त्यांस सांगतों श्वशुर तयांचे '**तात्या पं**तोजी' !

होती श्वशुरांहुनि कांकणभर वरचढ ही स्वारी,
बंडी, चंची, छत्री, धोतर यांस बहिष्कारी !

गंध आडवें, जाड जानवें, ढोंपरभर पंचा,
वर्ण सांवळा देह शोभवी **गो**पूकाकांचा.

घडि पंचाची खांद्यावरतीं डाव्या शोभावी,
उन्हांत जातां छत्रिऐवजीं तीच शिरीं यावी!

पानसुपारी–तंबाखूचें बटवा माहेर !
मठींत **का**का असतां गुडगुडि शब्द करी थोर !

पूजा, अर्चा, कडक सोंवळें, एकनिष्ठ भाव,
निस्पृह वाणी **का**कांची हें मान्य करी गांव !

[ २ ]

साधेंभोळें कुटुंब पहिलें **गो**पूकाकांचें,
निधान झालें परि तें होतें त्यांच्या प्रेमाचें.

---

* वास्तविक **गो**पूकाकांचें घर लहान होतें असें नाहीं. पण त्यांनीं 'मठी' हें त्याला लाडकें नांव दिलें असल्यामुळें आम्हींही तेंच वापरलें आहे.

झिजतां झिजतां पार पावला पिंपळ काकूंना!
बहु वर्षांना एक लाधलें पुत्र-रत्न त्यांना.

उत्कर्षाला पावत असता प्रमोद काकांचा,
दुर्दैवानें हाय! घेतला घात कसा त्यांचा!!

बाळ हरपलें! शोकें पडल्या काकू आजारी,
होइल वायू ह्मणुनी जपले काका त्यां भारी.

'भलतें सलतें औषध देतिल गांवांतिल वैद्य,
करूं नये तें करावयाला सांगतील पथ्य!

विश्वासावें तयांस कोणीं? कैवारी **राम,**
तीर्थ तयाचें देतां तिजला पडेल आराम.'

विचार ऐसा करुनि पाजिती पत्नीला तीर्थ!
घातक झालें तेंच शेवटीं, यत्न ठरे व्यर्थ!

जिच्या निवासें मठिला शोभा स्वर्गाची आली,
सोडुनि सारें अकस्मात ती स्वर्गाला गेली!

आकाशांची कुऱ्हाड ऐशी काकांवर पडली,
विधुरावस्था भोगायाचें ये त्यांच्या भालीं!

"कवडीचुंबक **गोपू**काका, म्हणुनी काकूला-
औषधपाणी दिधलें नाहीं! जीव तिचा गेला!"

अशीं दूषणें अनेक देती गांवांतिल लोक;
देउत वेटे! करकरति का जागीं थोडे काक?

हाल मांडिले किति काकांनीं अपुल्या देहाचे-
पत्नी गेली म्हणुनी, तें या न वर्णवे वाचे!

नेत्रांमधुनी थोर वाहती अश्रूंच्या धारा!
सुदीर्घ ऐसा मधुनि टाकिती काका सुसकारा!

अर्धांगीचें लुगडें रात्रीं पांघरण्या घ्यावें,
तत्प्रियवस्तुंस पाहुनि त्यांनीं स्फुंदूं लागावें !

चुलींतुनी जो लोट धुराचा जाई आकाशीं,
सांगत बसती *'गोड निरोपा' पत्नीला त्याशीं ! !

⁂ ⁂ ⁂

वयस्य त्यांचे शेवटिं आले, घालिति समजूत !
'पुरे शोक हा ! मेलें माणुस परत नसे येत !

संसाराचा शकट चालवा लग्न दुजें करुन,
लग्नाचें वय अजुनि आपुलें (!) नव्हे म्हणे कोण ?'

प्रयत्न जेव्हां भगीरथासम मित्रांनीं केला,
समजुत झाली ! शोक सर्वही काकांचा गेला ! !

उचल घेतली मंडळिनें मग दुसऱ्या लग्नाची,
काकांनींही सैल सोडिली पिशवी पैशांची !

पंतोजींची बयो धाकटी बारा वर्षांची,
गोरिगोमटी, धीट, बोलकी, चुणचुणीत साची;

सद्‌भटानें जाउनि तेथें शिष्टाई केली,
देणें घेणें ठरुनि वधू ती नेमस्तहि झाली !

पंतोजींनीं सहस्र रुपये घेउनि काकांना–
दिली कन्यका, गृहस्थ केलें पुनरपि कीं त्यांना.

---

* मार्गी जातां शिखरितरु ते उच्च विश्रांति घ्याया ।
स्रोतांचेंही लघुपय जिथें श्रांत होतांच प्याया ॥
ऐसा मार्ग श्रवण कर गा ! त्वत्प्रयाणानुरूप ।
पश्चात् तूतें कथिन जलदा ! गोड माझा निरोप. ॥ १२ ॥
रा. भालचंद्र शंकर देवस्थळी–यक्षसंदेश.

( वरील प्रसंगावरून कोणा प्रतिभासंपन्न आधुनिक कवीला 'धूम्रदूत' काव्य रचण्याची स्फूर्ति झाल्यास गोपूकाकांना धन्यता वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. )

संसाराचा गाडा चालू काकांच्या झाला !
पूर्ववृत्त हें कथिलें वाचक ! सारें तुम्हांला.

[ ३ ]

कवींद्र काकांवरी पाडिती पाउस काव्यांचा !
टीकाकारां विषय अलिकडे झाला काकांचा !

गटारयंत्रावरी उठवुनी गप्प कुणीं द्यावी,
तिचीच चर्चा गांवामध्यें रात्रंदिन व्हावी.

कुणी बोलतो, 'जमला यांचा जोडा पण जोडा !
नांवें टिकल्या ठेविल जन तो समजावा वेडा !'

"पतिपत्नींचें भांडण चाले !" बोलतसे कोणी,
"केरसुणीचे बयो तडाखे काकांना हाणी !

तेही रागें धरुनि ओढिती करें तिची वेणी,
करी पलायन माहेरीं ती हिसका देवोनी !

कन्या शोभे गोपूकाकां जरि त्यांची राणी,
भली भेटली काढी पतिच्या नयनांतुनि पाणी !"

अशा तऱ्हेची नित्य बातमी गांवीं पसरावी,
साधारण जन ! त्यांस त्यांतली गोम काय ठावी ?

उदात्ततेचा, स्वर्गीयाचा, दिव्याचा गंध–
नसे तयांना ! स्वार्थ सर्वदा वाटे सुखकंद !

भांडण कसलें ? प्रेम–कलह तो चाले दोघांत !
छटा प्रीतिच्या नेत्रांमध्यें तेव्हां खुलतात !

'क्रोध' तयांना खुशाल बोलो व्यवहारी वीर,
'छटा प्रीतिच्या !' पुनः पुन्हा तरि आम्हीं म्हणणार.

प्रणयरसाचे गोपूकाका असुनी अवतार,
टीकास्त्रांचा कसा तयांवर होतो भडिमार ?

देवा! नाहीं न्याय काय रे! घरीं तुझ्या उरला?
म्हणुनि दूषणें दुर्जन देती गोपूकाकांला!!

माहेराला रुसुनी गेली त्यांची 'गो' म्हणुनी,
अन्नपाणिही टाकुनि दिधलें गोपूकाकांनीं!

हवा कशाला प्रत्यय दुसरा त्यांच्या प्रेमाचा?
उज्ज्वल, निश्चल, अविनाशी तें, अनुभव हा साचा!

दुसरे दिवशीं उठुनि तांतडी काकांची स्वारी,
प्रातर्विधि उरकून चालली श्वशुरांच्या दारीं!

पाहुनि अपुल्या 'गो'चा सारा रुसवा गेलेला,
वदती श्वशुरां 'आलों आहें तिजला न्यायाला.'

जामातांचें स्वागत करिती तात्यापंतोजी,
*राधाकाकू जाया होती पति-सदनीं राजी.

भाजिभोंपळे घेउनि निघती कन्या-जामात!
पोंचवावया दूरवरी त्यां पंतोजी येत!

आवृत्त्या जरि या कृत्याच्या अनेकदां झाल्या,
ऐकायाला ग्रामस्थांना येना कंटाळा!

[ ४ ]

कालनदीचा सदा चालला प्रचंड जो ओघ,
त्यांत वाहतां बदलत जाई सृष्टीचें रूप.

गोपूकाकांकडचा मनुही आतां पालटला,
स्थूलत्वानें राधाकाकुंस पोक्तपणा दिधला!

विशालबुद्धिद्योतक ऐसें विशालसें डोकें,
भार तयाचा वाहुनि आलीं पाठीला पोकें,

* बयोचें सासरचें नांव.

जरत्कारुचा सखाच ! ऐसा चिरंजीव झाला;
प्राण सहावा समजति काका काकू परि त्याला.

नसतां जवळी सुत, काकांच्या स्वास्थ्य मना नाहीं,
जिवास करिती करमणूक ते म्हणुनि तदा पाहीं !

पानसुपारी-तंबाखूचे वारांवरि बार-
भरुनी काका करिति अंगणावरतीं भडिमार !

'पिच पिच पिच पिच' शब्द चालतो मान पुढें वांके !
मुखरस पुढतीं चिळकांड्यांच्या रूपानें फांके !

कविजन अपुलीं नऊ रसांनीं काव्यें भरितात,
नवें न कांहीं त्यांत म्हणुनि जे त्यांना हंसतात,

या ते आतां पुढें पहाया काकांच्या कृतिला !
कसे भरिति ते नव्या मुख-रसें पहा अंगणाला !

भान न उरलें ! तन्मयवृत्ती काकांची झाली !
स्वार्थपरायण जगा ! पाहिजे शरम तुला गमली !

कवना नाहीं विषय म्हणुनि जे रडत कवी बसती,
रचा काव्य ते उत्साहें या समाधिच्या वरतीं.

मुखरस अपुला गोपूकाका ! असाच वाहूं दे !
लोंढा त्याचा भूमितलावर वाहूं लागूं दे !

हंसेल तुम्हां जन तो त्यामधिं बुडुनी जाऊं दे !
"*स्वार्थाचें मग नांव तरी का उरतें पाहूं दे !"

(१९१४.)

*गोविंदाग्रज-चिमुकलीच कविता.

# लेडी-हार्डिंज-निधन !

## गीती.

सद्गुणमणि-मंजूषा, भासे केवळ दयाच जी मूर्त,
तिज गिळुनि काळसर्पा ! आतां तूं जाहलास ना शांत ? १

राजाच अधाशांचा काळा ! तूं असुनि हें जनीं ख्यात,
वेड्यासम काय तुला पुसतों मी, 'जाहलास ना शांत !' २

भक्षिसि योग्यचि त्यांतें बा ! ज्यांचें नित्य तामसी ध्येय,
परि अबलेला भक्षुनि केला पुरुषार्थ तूं असा काय ? ३

लेडी हार्डिंज सती ! मन मृदु तुमचें जसें सुनवनीत,
परि कठिण तया केलें ! गेलां वुडवुनि अह्मास शोकांत ! ४

या ! या ! परतुनि मागें, देवी आह्मां असें न सोडुन द्या,
तुमच्या वियोगदुःखें अश्रूंच्या थोर वाहतात नद्या ! ५

नाथ व्यसनीं असतां भीतिवशा लेशही न जी झाली,
मृत्यूस वश अकालीं व्हायाचें विधि लिही तिच्या भालीं ! ६

हार्डिंज धैर्यशाली क्षमागुणें धर्मराजसा गमला,
भर्तीच आपुला तो, स्वाभाविक मग असेल हळहळला ! ७

कल्याणप्रद संस्था काढुनि बहु दाविलीत वत्सलता,
दाटून कंठ येतो, वदवेना शब्द सर्व तें स्मरतां ! ८

वरितां परत्र आपण हिंदी वनितांस कोण कैवारी ?
माउलिसमान होउनि त्यांच्या हो कोण आपदां वारी ? ९

हें जग पापी गमलें, त्यागाया ह्मणुनि बुद्धि का झाली ?
तेणें ही शेवटची चिरकालिक झोंप आपणा आली ? १०

शक्त न ती दवडाया, ह्मणुनि अह्मी मग्न राहतों शोकीं,
देवो अखंड शांती परमात्मा आपणास परलोकीं. ११

# कवि किती कवनीं परि वर्णिती ?

[ **नवयुग** मासिकाच्या एप्रिल १९१५ च्या अंकांत '**जन किती नयनीं परि पाहती ?**' या मथळ्याखालीं एक छोटेखानी कविता प्रसिद्ध झाली होती. ती वाचून मनांत आलेले विचार. ]

श्लोक.

सुख गमे इतरांप्रति दूषितां,
लव दिसे अपुली न सदोषता !
वचन वर्तन भिन्न नव्हे क्षण,
जन तया करि सादर वंदन. १

प्रणय-मत्तपणें भ्रमली मती,
ह्मणुनि काय विचित्र घडे कृती ?
विषय वर्ण्य जरी असले किती,
तरि न बाळगिती लवही क्षिती ! २

घुसळितां इतिहास महोदधि,
मिळति वीर-शिरोमणिंचे निधी !
कितिक साधु, नृपाल, तशा सती;
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ३

नरपती चरणीं करिती नती !
फिरुनि देशभरी करि जागृती;
उचित नाम '**समर्थ**' तयाप्रती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ४

बुडत **भू** असतां **हरि** उद्धरी,
जनहितास्तव **राक्षस** संहरी;
कृतिस त्याच करी '**शिव**' भूपती
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ५

धरुनि धिंड चमूंतुनि काढिली,
नयन फोडुनि जीभहि छाटिली !

श्लोक. तरिहि धर्मिंच 'शंभु' धरी मती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ६

सकल घे अरि राज्य हिरावुन
तरि न धैर्य जयें त्यजिलें क्षण,
शिवसुत प्रभु 'राम' महामती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ७

पळ मनास शिवे न अहंकृती,
लवहि जीस रुचे न निजस्तुती,
अमर-वंद्यहि इंदुरची सती,
कवि किती कवनीं परि वर्णिती ? ८

---

## *मयूरास—

झाडें पेटुनि वाजती न, सखया ! मेघध्वनी होतसे,
ज्वाला ह्या नसुनी नभीं स्फुरत रे सौदामिनी ती असे;
काळा धूर नव्हेच हा पसरला, तो मेघ आहे खरा;
वर्षाकाल असे, दवानल कसा वाटे तुला सुंदरा ? १

वैरी सर्वहि नष्ट होउनि तुझे केव्हांच गेले सया !
आतां सर्व सुहृत् तुझे असुनिही कां घेसि चित्तीं भया ?
मेघावांचुनि कृष्ण येथ न दुजा, तोही तुला चाहता;
तापा नाशुनि जाहला तुजवरी प्रेमाश्रुतें वर्षिता. २

---

*ही अन्योक्ति रचण्यास पुढील श्लोक कारण झाला आहे:—

झाडें पेटुनि वाजती कडकडां त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला. हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा दवानल असे. मोरा ! पळें रे घरा १

—कृष्णशास्त्री चिपळूणकर.

श्लोक. ज्यातें नाहीं सुललित-कला-सद्रसाचीहि गोडी,
प्रेमा नाहीं किमपि हृदयीं, ज्या न वैराग्य सोडी,
ऐसा तो बा! अरसिक महादेवही येथ नाहीं !
कैलासीं तो कधिंच वसला जाउनी स्वस्थ पाहीं ! ३

ऐके त्वद्रव, बोलतो, 'निघतसे हा ओक-वृक्षांतुनी!'
त्या मित्रा करि नष्ट-वैभव पहा ही धन्य कादंबिनी.
ही चेतोहर दिव्य मेघ-वनिता विद्युल्लता पातली,
नाथांकावरि बैसुनी क्षणभरी, क्रीडावया लागली. ४

कारुण्यें परिपूर्ण ऐकुनि तुझी स्वर्गीय 'केकावली'
भक्तोद्धारक विष्णुची तुजकडे दृष्टी दिसे वेधली;
वाटे श्यामल मेघ तोचि मजला आतां असे जाहला,
मत्तां त्वद्रिपुतें भयप्रद असा गर्जावया लागला. ५

मित्रा! ज्यांच्या हृदयिं कधिं बा स्निग्धता लेश नाहीं!
क्रीडा ज्यांची द्विज-हनन ही, तींत ज्यां सौख्य, पाहीं!
भक्षोनी जे पिशित, मदिरा-सेवनीं नित्य दंग,
भिल्लांतें त्या पळवुनि दुरी लावितो मेघ आज. ६

वाटे जातें पळत इथुनी मूर्त हें पाप काय!
किंवा रात्रींतिल तिमिर हें भीतिनें दूर जाय!
ऐसा शोभे सकलहि पहा! धांवतां भिल्लसंघ;
भ्याला मेघा, विहगपतितें भीति जैसे भुजंग. ७

ये ये! ये द्विजसत्तमा! गिरि-शिरीं, नृत्यास तेथें करीं,
केका त्या तव ऐकण्यास बहु हा औत्सुक्य चित्तीं धरी;
पुष्पांतून जसा गळे मधु, तसा सद्भाव कीं ज्यांतुनी
पीयूषाहुनि गोडसा थबथबे, सेवीन का त्यांस मी? ८

आहे विष्णुच हा पयोधर, तडित् तें होय पीतांबर,
वाटे कैरव-मालिका बक-तति, क्षीराब्धि नीलांबर;

श्लोक. मित्रा ! ती प्रभुची दया खचित ही धारा जलाची असे
झंझावात सुपर्ण यांत मजला शंका कदाही नसे. ९

सों सों शब्द पहा प्रकंपन करी, तो वाटतें ऐकुनी
श्रीविष्णुद्विज-पक्ष सामनिगमा गातात का हर्षुनी !
तैशी ही वनचारुता गमतसे देवी रमा पातली;
त्वद्रूपा अवलोकुनी अतिशयें तद्वृत्ति आनंदली. १०

येवोनीयां गिरिवरि घनें शोभवीतांच सानु,
वप्रक्रीडा करित गज हा मानितातीं करेणु !
शैलाग्रीं त्या त्वरित निघती विव्हला कामबाणें,
त्यांतें ऐशा समयिंहि न बा ! टाकवे मंद जाणें ! ११

जीमूताचा ध्वनि परिसुनी केसरी क्षुब्ध झाला,
त्यागी वेगें गिरिकुहर तो सानु-भागांत आला !
क्रोधावेशें करित फिरतो गर्जनेतें प्रचंड,
त्याचें नाहीं तुज भय, रहा तूं मयूरा ! उदंड. १२



जाई जेव्हां गळुनि तव तो रम्य ऐसा पिसारा,
कोणी स्वार्थप्रिय जन तुला देत नाहींच थारा !
ऐशा कालीं निबिड वनिं बा ! जाउनी त्वां रहावें,
केव्हां केव्हां परि कविजना दर्शना देत जावें. १३

श्लोक. येई जेव्हां पिक, मधु, सुमें घेउनीयां वसंत,
ज्यातें कामी, रसिकहि तसे मानिती सर्व संत,
आरामीं ज्या ललित वनिता येति तेव्हां प्रमोदें
दावोनी त्यां नव रुचिरशा पिच्छभारा सुखा दे. १४

ऐकोनीयां श्रवणमधुरा नूपुरांच्या रवांतें
त्यांच्या तालावरि करिं सख्या ! तूं तिथें नर्तनातें.
होतां ग्रीष्मीं प्रखर तरणी राहणें बा ! उदास,
प्रावृट्कालीं पुनरपि तुवां बाहणें तोयदास. १५

'देवांनीं बहु वानिली, मुनिवरीं शीर्षींहि जी वाहिली,
ऐशी म्यां नच पाहिली' शुक वदे, 'केव्हां न वा ऐकिली !
रंभा लज्जित जाहली परिसुनी, शक्रें सुधा त्यागिली !
ऐकाया मज सांपडो मग तुझी ती दिव्य केकावली! १६

(इ. स. १९१२.)



## *राजहंसासः—

### श्लोक.

पर्णांमाजी तरूंच्या अजुनिहि लपशी राजहंसा ! कशाला ?
गेले वर्षर्तुचे ते दिवस निघुनि रे ! हा शरत्काल आला.
झाले हे मेघ सारे सलिलरहितसे श्वेतता ये तयांला
वानप्रस्थाश्रमातें वरिति बुध जणों सोडुनी संपदेला ! १

हिमाचीं शृंगें हीं उदधिवरि वाटे विहरती !
यशें साधूंचीं वा सकलहि दिशांतें पसरती !
अशीं अभ्रें शुभ्रें फिरति गगनीं स्वैर विहगा,
तयांसंगें तूंही त्यजुनि भय, संचार कर गा ! २

शृंगारी वनदेवता निजपुरा, वल्लींस केल्या ध्वजा,
ज्या उत्तुंग शिलांवरी विलसती सर्वत्र आनंद ज्यां,
कासारीं सुविकास होय कुमुदीं, गुंजे मिलिंदावली;
हंसा ! ये शरदुत्सवार्थ तुजला भीती नसे राहिली. ३

तारानाथ तुझा सखा द्विजवरा ! धारा सुधेच्या स्रवे,
पानातें करितो चकोर, न तया इंदुप्रती वर्णवे !
वाहे निर्मल नीर साधु-मनसें या चंद्रकांतांतुनी,
आनंदातिशयें अहा ! डुलतसे सृष्टी सती मोहिनी ! ४

चंद्राची रमणीयता निज-मुखीं बिंबोष्ठ रामा धरी,
चापल्यांत करी परी युवति ती विद्युल्लतेची सरी !

---

*पानांमाजी तरूंच्या लपुनि बस कुठें राजहंसा ! कशाही
जाती वर्षर्तुचे हे दिवस तंववरी सर्व कष्टांस साहीं,
देवोनी शारदश्री पुनरपि फुलतां पद्मवृंदें तयांचा
भोक्ता नाहीं कुणीही तुजविण दुसरा, जाण हा नेम साचा.

—कृष्णशास्त्री चिपळूणकर.



"वैदेही-नयनेंच हीं प्रभु करी आरोप इंदीवरीं." ( पृष्ठ ६५ पहा. )

आरामीं तिज तूंच हंसगमना हंसा ! करावें तरी
मुक्ता देइल भक्षण्यास मग ती तूतें सुखें सुंदरी. ५

"आहे एकचि शुक्र पक्ष तुजला, आह्मांस हे दोन रे !
शुभ्रांशो ! तव गर्व लेशहि गड्या ! आह्मांपुढें ना उरे!
आह्मींही बसतों तुझ्यासम कधीं बा ! मीन-राशीवरी !"
ऐसें इंदुस निंदुनीं बक पहा ! आनंदले स्वांतरीं. ६

दर्पा त्यांच्या तुजविण दुजा शक्त नाहीं हराया,
दे, दे आतां तरुकिसलया सोडुनी हंसराया !
क्षुद्रांचें त्या किमपिहि नको वाढुं देऊं महत्त्व,
दावीं त्यांतें त्वरित विलया गर्व ने हेंच तत्त्व ! ७

करावें क्रीडेतें जरि तुज रुचे मानस-सरीं,
जलीं मित्रा ! ज्याच्या कनक-कमलें शोभति वरीं;
परी जेथें सारीं अरसिक पिशाच्चेंच वसती,
करावी कां तुझें क्षणभरि तरी तेथ वसती, ? ८

लाधे राघव-संग पूर्व-सुकृतें त्रेतायुगीं ज्या स्थला,
यत्पापां हरि वारि सिंचुनि नदी गोदा सदा निर्मला,
यावें पंचवटींत त्या झडकरी आकाशमार्गें बुधा !
तेथोनी धरणें पुढें प्रियकरा ! त्वां दक्षिणेच्या पथा. ९

श्रीसीताविरहानलें रघुपती पोळून ज्याच्या तटीं,
बैसे सेवित शीत मंद पवना, चित्तीं स्मरे गोरटी,
वैदेही-नयनेंच हीं प्रभु करी आरोप इंदीवरीं,
त्या पंपाख्य सरोवरीं शुचि जलीं क्रीडेस हंसा! करीं. १०

मार्गीं तूतें अमृतकर तो म्लान ऐसा दिसेल,
आपत्कालीं बघुनि कविही लाविती त्यास बोल !
उत्कर्षातें उडुपति कसा चंद्र साहे रवीच्या ?
भानु स्वश्री अवगणितसे ! नाद त्याला उपेचा ! ११

ज्यातें सारे वदति जन 'हा लोक-कल्याणकारी,'
कर्तव्या जो विसरुनि परी होय कामार्त भारी,
राहे शीर्षी उदयगिरिच्या, सोडुनी सर्व शील,
हंसा! तो वा प्रणयरतसा मित्रही पाहशील १२

वर्षाकालीं जलधर सुखें जेथ विश्रांति घेती,
हर्म्यांचीं तीं अमित शिखरें ज्याप्रती शोभवीती,
चार्वंगींच्या वदन-शशिनीं भूषिता चंद्रशाला,
जातां मार्गे सहज वरुनी तूं पहा त्या पुराला. १३

क्षीरामाजी बहु मिसळलें नीर तें प्राशितातीं—
उत्कंठेनें, सकलहि तिथें लोक अज्ञान-राशी.
काढोनीयां सलिल अवघें, शुद्ध दे त्यां पयातें;
हंसा! हें त्वद्व्रत असुनि रे! त्यागिशी कां तयातें? १४

करोनी कृत्यां ह्या त्वरित धवला! जा मग सरीं,
तुझ्या सत्कारातें करिल विनयें वात-लहरी.
शिरें तूं कासारीं विविध कमलें तेथ फुलती,
तटें शैवालानें मरकत-शिलांचींच दिसती. १५

राहें तेथें विहरत सुखें रम्य पंपा-जलांत,
ठेवो आतां करुण भगवान् नित्य तूतें सुखांत.
होई काम त्यजुनि रुचिरा! *मित्र हा *हंस जेव्हां,
जावें हंसा त्वरित मिळुनी तत्स्वरूपांत तेव्हां. १६

* मित्र व हंस हे शब्द सूर्य शब्दाचेच वाचक आहेत. प्रस्तुत प्रसंगीं आरक्त वर्ण सूर्यास 'मित्र' व उज्ज्वल कांतीनें युक्त सूर्यास 'हंस' असे शब्द वापरले आहेत.

# भ्रमरास–

### श्लोक.

येतां हा ऋतुराज, भूवरि करी गानाप्रती कोकिल,
नारींच्या कुटिलालकां धरितसे तो धीट मंदानिल !
आम्राची नव मंजरी शर करी प्रद्युम्नदेव त्वरें,
एकांतांत नितांत शांत अझुनी कांरे असा तूं अले ! १

गेलें सर्व हिम, प्रभा वितरितो आतां सुखें अर्यमा;
रात्रीं कैरविणी प्रफुल्लित दिसे येतां नभीं चंद्रमा,
उद्यानीं शुक सारिका विहरती सानंद वृक्षांवरी,
पुष्पांतून गळोनियां मधु तळीं आळीं तरूंचीं भरी ! २

भृंगा ! आली अतुल सुषमा कानना या सुकाळीं,
सत्प्रीतीच्या उमटवि छटा पल्लवीं रम्य लाली !
होती कोठें अगणित सडे वा ! फुलांचे फळांचे,
भूभागातें सुमरज पहा ! रंगवीतात साचे ! ३

कोठें कोठें बकुल फुलले, ती सुरंगीहि कोठें,
कोठें झाल्या कुसुमित लता, गुच्छ ज्यां येति मोठे;
कोठें पंकीं उगवुनि दुरी ऱ्हादिनीच्या तटाकीं,
दिव्यामोदें भरुनि अवघें केतकी विश्व टाकी ! ४

जेथें चंदन–मंजिऱ्या विकसल्या, तेथील गंधास घे,
तापा वारित दूर दूर फिरण्या हा शीत वायू निघे;
तूंही त्यासह गात गात मधुपा ! मारीं भरारी वरी,
उल्हासें मग पाहतील तुझिया लीलांप्रती सुंदरी. ५


वदे कोणी तूतें 'मलिन' तव वृत्ती 'न अचल'
तुझ्या गुंजारावा 'बडबड' कुणी बोलति खल !

परी सौजन्याचे जगतिं पुतळे कोण ठरले ?
विशुद्धात्म्यांतेंही कितिक असती निंदक अले ! ६

सती सीतादेवी विमलचरिता, आर्यमहिला-
जिचीं गाती गीतें; गुण वसतसे जींत पहिला;
धरा माता जीची, जनक नृपती तातहि भला,
जरी पुण्यश्लोका, तरि खलजनीं दूषिलि तिला !! ७

त्वद्गानीं रममाण होय कविही तो 'केशवाचा सुत'
*आनंदें परिपूर्ण गान मधुपा ! त्याला तुझें भासत;
येणें शोभसि षट्पदा ! सुकविंचा तूं सत्य चूडामणी !
पीयूषासम गोडशा करित जा गुंजारवाला वनीं. ८

ज्याच्या गानीं रसिक-मतिनें गुंगुनी नित्य जावें,
मोदें ज्यानें कुसुम-सुरस-प्राशनीं दंग व्हावें,
जो या लोकीं अखिल गमतो एकचीं रम्य रंता,
कैसा श्रेष्ठ भ्रमर कवि तो राहिला स्तब्ध आतां ? ९



तुला भृंगा ! ऐसें उचित नच गा ! स्वस्थ बसणें,
वसंतीं चालूंदे उपवनिं तुझें स्वैर फिरणें;

---

* " श्रुति वैचित्र्या बघणारे, आह्मीं मात्रा जुळणारे !
कवि आह्मांलागुनि ह्मणणें, कवि शब्दार्थां लोळविणें !
अस्मद्गान नव्हे गान, तें गाना चिंध्यादान !
परंतु भृंगा ! तव गान, परमानंदें परिपूर्ण !"

केशवसुत—भृंग.

मरंदां आमोदां अलिकुलवरा ! सेवित रहा;
प्रसूनांचा होवो समय तुजलागीं सुखद हा !  १०

होई वृत्ति तटस्थ ऐकुनि तुझा स्वर्गीय गुंजारव,
गा ! गा ! गा मधुपा ! निरर्थ करिती हे वल्गना मानव;
झाले कुंजरसे प्रमत्त, इतरां देती वृथा दूषण,
सृष्टीचे नच लाडके, त्यजिति ना स्वार्थास एक क्षण ! ११

बोलोनी वचनें निरर्गलपणें, घेवोनि वेडेपण,
उच्चस्थान कवींत सांग चतुरा! पावेल कैसा जन ?
आम्राच्यावरि काक बैसुनि जरी पावे पिकाची सरी,
ब्रह्मा केविं ह्मणूं नये मग सख्या ! त्या कुंभकारा तरी? १२

पूर्वी जे 'मृतधर्म' पाळिति कवी, जीवंत काव्यें कशीं–
त्यांनीं निर्मिलिं ? वाटतें मज सदा आश्चर्य हें मानसीं !
आतांचे चिकटून काव्य करिती जीवंत धर्माप्रती,
होतें तें मृत तत्क्षणीं तरि कसें ? कोडेंच हें संप्रती !  १३

त्या कोड्याला उलगडुनियां दाखवी निश्चयानें,
ऐसा लोकीं बुध न दुसरा तूझियावीण, जाणें !
तूझा आह्मां दृढ भरंवसा, त्वां भ्रमा घालवावें,
तो तूं मौना धरुनि बससी ! काय याला ह्मणावें ?  १४

आतां ऊठ, अझून काय बससी तूं स्तब्ध येथें असा ?
राजा तूं असतां, वसंत–समयीं कां भाससी दीनसा ?
पुष्पांचा दुसरा तुझ्याविण जगीं भोक्ता न कोणी असे;
हें सारें तुज ठाउकें असुनिही कां वेड घेसी असें ?  १५

माधुर्यें भरलें, जयांतुनि सदा सद्भाव खालीं गळे,
जें स्वर्गांतहि आगळें, कवि खुळे होतात ज्याच्यामुळें,
डोले मोदभरें जया परिसुनी सृष्टी सती सुंदरी,
सेवाया मज सांपडेल वद तें त्वद्गान केव्हांतरी ?  १६

(इ. स. १९१४).

# मेघमुक्त वासरमणीस:--

श्लोक.

पृथ्वी आक्रांत केली निबिडतर तमें ज्यांचिया आश्रयानें,
त्या उन्मत्तां घनांचा सकल मद पहा! शारदश्री लया ने.
आतां दाही दिशांना तिमिर पळतसे होउनी निःसहाय,
जाई गा! त्वद्युतीनें भरुनि दिनकरा! भूमि तैसें विहाय. १

झाला जो वनदेवतांप्रति सदा क्रीडावयाला स्थल,
ज्याचीं भेदित तुंग भव्य शिखरें जाती नभोमंडल,
त्या शैलेंद्र हिमालयावरि असे जाऊन जी राहिली,
ती भानो! अनुतापशुद्ध निरखीं ही शुभ्र मेघावली, २

कोठें मंजुळ नाद काढित नदी अच्छोदका चालली,
येती सत्कविकल्पनेसम जिच्या पृष्ठीं तरंगावली;
कोठें पुष्पवती लता मृदुलशा वृक्षाश्रयें राहिल्या,
सत्कारोनि सुमांजलि प्रथम कीं ज्यांनीं तुला वाहिला. ३

कोठें रम्य सरोवरीं पिउनियां आकंठ पद्मासव,
पाहें तृप्त मनें करीत फिरती हे भृंग गुंजारव;
आपत्काल सरे, प्रकाश पसरे, चिंतेस थारा नुरे,
गाती पक्षिकुलें विलोकुनि तुला सानंद नानास्वरें. ४

ज्यांचीं कृष्ण, सतेज, विस्तृत अशीं पाहूनियां लोचनें,
चार्वंगी झुरती मनीं निशिदिनीं निःसार वाटे जिणें!

---

*ह्या कवितेची कल्पना खालील दोहऱ्यावरून सुचली—
" कबहुँ दिवस महुँ निबिडतम कबहुँक प्रगट पतंग,
बिनसइ उपजइ ज्ञान जिमि पाइ कुसंग सुसंग."
श्रीतुलसीरामायण—चतुर्थ सोपान.

स्वैर क्रीडति काननीं चपल तीं सारंग-बालें अहा !
तूं तेजोनिधि पावतांच उदया आनंद ज्यांना महा. ५

लतांचे हिंदोळे करुनि बहु खेळे कपि-गण,
पहा ! कैसा त्याचा कलकल करी क्षुब्ध विपिन !
परी लुप्ता जेव्हां करुण तरणे ! मूर्ति तव हीं,
तदा भासे त्याला युगसमचि बा ! एक पळही ! ६

जीमूतांनीं तुज दिनमणें ! झांकिलें पूर्ण जेव्हां,
कृष्ण ध्वांतें अनय करुनी पीडिले साधु तेव्हां !
नीचींमात्र प्रबलपण ये मांडिती तांडवाला,
" अस्मद्दैवें अधम रवि तो " बोलती, " नष्ट झाला !" ७

सरीं झंझावात क्षणिंच करि विच्छिन्न कमलें,
मदें मोडी वृक्षां भरिति जगती जे परिमलें;
भयानें कोकांच्या करिति विवरीं वास रमणी,
" अहा ! कैसा गेला," वदति " रुसुनी वासर-मणी !" ८

केव्हां घोर श्रवणिं पडती गर्जना जंबुकांच्या,
केव्हां चाले कटुतर असा नादही कीटकांचा;
हर्षोद्रेकें तरुवरि करी घूक घूत्कार थोर !
उल्हासोनी खर मिळविती आपुला त्यांत सूर ! ९

ज्यांचा पद्माकर-शुचि-जलीं नित्य चाले विलास,
पर्णीमाजी लपुनि बसले सर्व ते राजहंस !
ग्रीष्मीं होत्या अति मलिन ज्या पावुनी खंड खंड,
गर्वानें त्या फुगुनि करिती घोष कुल्या प्रचंड ! १०

गेला आतां निघुनि पारे तो जाण पर्जन्य-काल,
ज्यामाझारीं दिसत नयनां सृष्टिदेवी कराल;
मांगल्याचा अनुपम निधी तेविं जो चारुतेचा,
मित्रा ! आला सुखद तुजला तो शरत्काल साचा ! ११

आतां झांकुनि टाकण्या तुज न ये कादंविनी भास्करा,
हस्तें त्वां कुरवाळितां प्रमुदिता होईल विश्वंभरा;
ग्रासाया तव बिंब राहु न कधीं वांच्छा धरो अंतरीं !
सत्कारोत सदैव हर्षित मनें तूतें दिशा सुंदरी ! १२

तुझी भानो ! दीप्ती विमल गगना मंडित करो !
सुखें भारद्वाजद्विज मधुर गानें जग भरो !
करो पूजा तूझी मृदु रुचिर पुष्पीं उपवन !
सदा नेवो दूर स्फुट-कमल-गंधास पवन ! १३

झाला रात्रि-श्रम ह्मणुनि ज्यां लागली घोर निद्रा,
त्यांतें जागे कर झडकरी तूं कृपेच्या समुद्रा !
अंधारीं जे चुकुनि शिरले आडरानांत त्यांस.—
आणीं मार्गावरतिं भगवन् ! पाडुनीयां प्रकाश. १४

केव्हां भालीं शुभ तिलकसा शोभ पूर्वा दिशेच्या,
अंकीं निद्रावश कधिं रहा तूं रवे ! पश्चिमेच्या !
केव्हां व्योमीं विकसवित ये पद्मिनी सानुराग !
आतां तूतें क्षणहि न घडो त्या प्रभेचा वियोग ! १५

ज्ञाता, सद्गुरु, सर्वसाक्षि भगवान्, तूं सूर्यनारायण,
पाता सर्वहि वस्तुंचा, करितसें भावें तुला वंदन.
गाया त्वद्यश पाहिजेत तुझिया ऐसे महात्मे कवी,
मी तों मानव हीन ! शक्त न तुझी वर्णावया थोरवी ! १६

[इ. स. १९१५.]



मेघमुक्त वासरमणीस— ( पृष्ठ ७२, श्लोक १६ पहा. )

# पुरवणी,

# ध्रुवावरील फुलें.

कवयित्री—माधवांगना.

[ श्रीमती सौ० रमाबाई काटदरे. ]

जन्म; रविवार, २३ फेब्रुवारी, १८९६.
विवाह; सोमवार, २७ मार्च, १९०५.
मृत्यु; मंगळवार, १३ जुलै, १९१५.



वरी शुक्ती मोठी सुबक तरि ती गण्य न मला,
तिच्या पोटीं मुक्ता-फल मम तया जीव भुलला !
वरा जो पीयूषें दिसत मज मृत्कुंभ भरला,
न रत्नस्वर्णांचा मधुरहि जलाचा घट मला !

—नारायण वामन टिळक.


Break, break, break,
On thy cold gray stones, O Sea!
And I would that my tongue could utter
The thoughts that arise in me.

O well for the fisherman's boy,
That he shouts with his sister at play!
O well for the sailor lad,
That he sings in his boat on the bay!

And the stately ships go on
To their haven under the hill;
But O for the touch of a vanish'd hand.
And the sound of a voice that is still!

Broak, break, break,
At the foot of thy crags, O Sea!
But the tender grace of a day that is dead
Will never come back to me.

*Tennyson.*


ऐवाचें वाटे नांव आपतें मागें ।
चिरकाळ, मनी हा ध्यास नित्य मज लागे ॥ ४
परि येतील मजला काव्य हार गुंफाया ।
मग राहील माझें नांव कसें जगतीं या ॥ ५
हा विचार येतां मन्मनिं न सुचे कांहीं ।
जाहलों [illegible] ॥ ६
दुःखानें नयनीं वाहूं लागलें पाणी ।
वदनें जरि मन हा वैर कंठ दाटोनी ॥ ७
मी [illegible] करुणा वाग्देवीची ।
त्वां पूर्ण [illegible] आस दोन्ही मन्मानची ॥ ८

हस्ताक्षर. ('माझे स्वप्न' पद्य.)

# पहिला यशस्वी प्रयत्न.

( पद्यमय पत्रिका. )

दिंडी. वसे हृदयीं निशिदिनीं एक मूर्ती,
जिच्यावरतीं अनिवार असे प्रीती,
तिच्या चरणांचें पुण्य वर्णुं काई ?
रमा तींच्या पार्दि लीन सदा होई ! 1

गीती. अपुल्या पत्रानें मज झालासे हर्ष मानसीं फार,
स्वीकारा चरणीं जो साष्टांगीं करितसें नमस्कार. २

श्लोक. हातीं सुंदर बूक इंग्लिश दिसे तें शोभतें त्या करीं,
शुद्ध प्रेम मनीं सदा वसतसे, तें दुःख माझें हरी;
ज्यांची मूर्ति मनीं सदा वसुनियां मोदें तयातें भरी;
त्या माझ्या हृदयेश्वराप्रति रमा ही वंदनातें करी. ३

कंठूं काळ कसा तुह्माविण इथें मी एकली राहुनी ?
होतें दुःसह दुःख तें अठवितां ये कंठ हा दाटुनी !
देवो तो चिरकाल सौख्य जयणा जो रक्षितो पामरें !
त्या ईशा कर जोडुनी विनवितें 'देई यशा यांस रे!' ४

गीती. निशिदिनिं सुखी असावें आपण, ही वासना असे माझी,
पूर्ण करो ईश्वर ती हृदयीं मी सर्वकाळ करितें जी. ५

दिंडी. सदा मजशीं बोलणें गोड झालें,
कधीं माझें मन नाहिं दुखवियेलें
प्रेम अपुलें पाहुनी कंठ दाटे,
ह्मणुनि लिहितांना हस्त इथें खुंटे ! ६

( इ. स. १९१० )

# हृदयेश्वरास.

अंजनीगीत. हृदयीं अपुल्या चरणां स्मरुनी,
प्रेमभरें त्यां वंदन करुनी,
अल्पमतीनें गीतें रचुनी,
लिहितें पत्रासी. १

श्लोक. असें मी अज्ञानी परि धरुनियां हिंमत मनीं,
रचोनी पद्यें हीं बहुत विनयें आर्पि चरणीं;
सदा ठेवा नाथा! मजसि अपुल्या दिव्य हृदयीं,
नका टाकूं दासी जरि न गमली ही सुखमयी. २

किती आनंदानें दिवस अपुले जाति निघुनी!
परी आली आतां असुखद निराशाच फिरुनी!!
स्मृती होतां येती भडभडुनियां, अश्रु पुरसे!
असे वेडी माया खचित जगतीं या गमतसे. ३

नाहीं सौख्य कशांतही, पदिं असे मच्चित्त हें गुंतलें,
पंचप्राण पहा! जडून चरणीं हे आपुल्या राहिले!
हा अंधार दिसे समूळ मजला आतां पहावें तिथें!
झाला दुःसह काळ संप्रति, कशी कंठू तया मी इथें? ४

सदा स्वप्नीं ध्यानीं मनिंहि अपुली मूर्ति दिसते,
तुह्मावीणें कोणावरि न मजला काव्य सुचतें!
असे झालें वेडी! कळत न मला 'काय करणें!'
न टाका वेडीतें सविनय पदीं हें विनवणें. ५

सोसूनी बहु कष्ट आपण मला सच्छिक्षणातें दिलें,
प्रेमानें मज नित्य बोध करुनी ज्ञानामृता पाजिलें;
सद्बोधामृत तें वसो निशिदिनीं हृत्पात्रिं या माझिया,
माझ्या संगतिनें तुह्माप्रति सदा लाभोत सौख्यें प्रिया! ६

जागी एकटि मी लिहीं निज करें ही पत्रिका आपणा,
झाली रात्र बहूत अंगिं सखया ! होतात या वेदना;
प्रेमानें वरचेवरी भरुनियां मत्कंठ हा येतसे !
प्रेमें ठेवुनि मस्तकास चरणीं ही पूर्ण केली असे. ७

---

## विरहिणी १.

श्लोक. गेली निद्रा मला ही त्यजुनि, विरह हा लागुं देई न डोळा !
आतां हा प्राण मातें जड बहु गमतो, हो कृपावंत काळा !
होवोनी त्वां दयाळू त्वरितचि करणें निश्चळें हीं ममांगें !
गेलें मी पूर्ण वेडी बनुनि निज–पती–दर्शनाच्यावियोगें. १

रानीं वा तटिनी-जलीं गमतसे मातें बसावेंचि तें !
बोलावें न कुणाशिं एकहि मुखें शब्दा असें वाटतें.
नाथा ! सद्गुण आपुले निशिदिनीं येवोनि डोळयांपुढें
प्रेमाची स्मृति होउनी रडतसें जाऊन एकीकडे. २

लागेना धड एक घांसहि मला तो गोड नाथा ! कदा,
पोटाची परि व्हावया भर पहा मी जेवितें सर्वदा !
तुह्मांतें किति हाल हाय ! तिकडे काढावया लागती !
हें येवोनि मनीं न अन्न उतरे केव्हां घशाखालतीं. ३

दिंडी. गोड मातें लागे न अन्न कांहीं !
क्षुधित मन हें दर्शनालागिं होई !
साहवेना हा विरह-ताप मातें,
हृदय तेणें मम भग्न पहा ! होतें. ४

श्लोक. अधिर मन असे हें जाहलें फार माझें
कधिं तदिय शांती दर्शनावीण होते !

बहुतचि शिणलें मी वाट पाहोनि नाथा !
त्वरित मन करावें शांत येवोनि आतां. ५

गीती. द्यावें सदैव मजला प्रेमातें, क्षुधित मी असें फार,
प्रेमाविण नाथा ! मी मागें नच अन्य तो अलंकार. ६

मीही अज्ञानपणें मत्प्रेमाचा विणूनियां शेला,
प्रेमभरें अर्पण तो अपुल्या पादांबुजीं असे केला. ७

चंदनवृक्षाऐसें अपणास्तव या तनूस झिजवीन;
त्या साध्वी माउलिच्या धन्य कुशीतें ह्मणून घेईन. ८

श्लोक. प्रभो मी आशेनें उभय कर हे जोडित असें,
दयाळा ! कन्या ही तव पदिं सदा प्रार्थित असेः—
'सदा ठेवीं देवा ! सुखरुप मम प्राणपतितें
न मागें मी कांहीं तुजजवळि यावीण परतें. ९

(इ. स. १९११)

---

## विरहिणी २

[ चाल–कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला० ]

विरहाग्नीनें हृदय पहा ! हें करपुनियां गेलें !
दुःखरूपि हे अगणित नाथा ! फोड वरी आले !

विरह-दुःख हें विषच खरोखर भिनलें मम हृदयीं;
प्राण तयानें घडिघडि माझा व्याकुळ हा होई !

काळ आपुल्याविणें मला हा कंठवे न आतां,
विरहाग्नीनें शरीर सारें भाजतसे नाथा !

क्षणोक्षणीं ही भडके कैशी विरहाग्नि-ज्वाला ?
मुखा आपुल्या उघडुनि वाटे घेते आंत मला !

प्रखर अग्नि मज भाजितसे हा शांत करा यातें,
दर्शनरूपी त्वरित मजवरी शिंपुनियां जल तें.

हीच सदा मी करीं प्रार्थना अपुल्या पद-कमलीं,
अपराधी मी असें परंतू द्यावें अभय मला.

(इ. स. १९१२)

---

## मातृ-स्मरण.

श्लोक. गेली हाय ! मला त्यजून *जननी या क्रूर मृत्यूमुळें !
तेव्हां बालपणांत मी असुनियां मातें न कांहीं कळ;
¶दादा सांगति, 'चुंबिलें किति तिनें अंतींहि बाळे तुतें.'
तेव्हांपासुनि हाय ! हाय ! मजला नाहीं तिचें सौख्य तें १

दिंडी. जरी जाया स्वर्गांत मला येतें,
तरी हरयत्नें ‡भेट तिची घेतें
नसे आशा प्रत्यक्ष पाहण्याची,
मनीं येउनि हें अश्रु वाहताती ! २

---

* सौ० गंगाबाई देवस्थळी, ( मृत्यु , इ. स. १८९७)

¶ गणेश सदाशिव देवस्थळी; ( कवयित्रीचे वडील. ) असगोली, जि० रत्नागिरी.

‡ भेटायास तिला मनीं उपजली अत्युत्कटेच्छा तुझ्या,
आर्ये ! संपविलें त्वरें ह्मणुनि का यात्रेस ह्या लोकिंच्या ?

—माधव.

गीती. एके दिवशीं रात्रीं शयनीं निद्रिस्त मी असें जेव्हां
मन्मातेची प्रेमळ मूर्ती स्वप्नांत पाहिली तेव्हां. ३

दिंडी. घट्ट हृदयीं मज धरुनि माउलीनें
अहा ! न्हाणियलें अश्रुंच्या जलानें
मातृ-अंकीं ठेवून मस्तकातें,
तिच्या प्रेमाच्या घेइं मी सुखातें ४

श्लोक. जागी होउनियां बघें चहुंकडे तेव्हां न कांहीं दिसे !
आलें स्वप्न असें कळून मग तें ! भ्रांतीहि गेली असे.
माते ! गेलिस हायगे ! मजसि कां टाकून तूं सत्वरी ?
गेली ती प्रिय माउली ! मज पुन्हा भेटेल केव्हा तरी ?५

(इ० सन १९११.)

## *श्रीरामाचें अयोध्येंत आगमन.

पद.

[ चाल–अर्जुना ! इतर मज कांहीं० ]

श्रीराम येति कीं बाई !
आनंद ह्मणुनियां होई–सकलिका ! ध्रु०

वनवास बहुत भोगोनी
श्रीराम येति परतोनी–निजपुरा;
आनंदभरित ही सारी
जाहली अयोध्यानगरी–ह्मणुनियां.
घ्यावया रामदर्शन तें
उत्कंठित मुनिजनचित्तें–जाहलीं !

* भगिनीसमाचार व मोदक या मासिकांतून ही कविता प्रसिद्ध झाली आहे.

रघुपती-भेटितें हृदयीं
कौसल्या व्याकुळ होई-बहुतची ! १

रावणादि शत्रु वधोनी
संग्रामीं जय पावोनी-रघुपती.
बंधमुक्त देवां करुनी
धाडितो तयां निजसदनीं-आदरें;
आनंदभरित होउनि ते
वर्षती देव सुमनांतें-प्रभुवरी !
देउनी तोष अमरांला
भेटले राम सीतेला-तेधवां. २

सौमित्र सवें घेवोनी,
परतले राम निजसदनीं-यावया.
पुष्पकीं बैसले भ्राते
शोभवी राम-अंकातें-जानकी !
जोडुनी करांतें दोन्ही
नत झाला राघव-चरणीं-मारुति.
नळ नीळ सवें घेवोनी
घननीळ राम निजसदनीं-पातले. ३

येवोनी निजसदनातें
करितात राम जननींतें-वंदना.
प्रेमानें राघव-माता
भेटुनियां श्रीरघुनाथा-तोषली.
अर्पुनी राज्य रामासी
लागला भरत चरणासी-बंधुच्या;
हर्षयुक्त होउनि भरतें
धरियलें छत्र निजहस्तें-प्रभुवरी ! ४

(इ. स. १९१२)

# *वनमाळी.

( चाल-अभिनव मधुलोलुप हे० )

वनमाळी-दर्शनासि जाउं चल गडे !
जळतिल मग पाप-राशि, पुण्य बहु घडे ! ध्रु०

सुंदर किति मूर्ति दिसे,
मुख-कमलीं स्मित विलसे,
प्रेमभरें पाहतसे सवंगड्यांकडे ! १

मुरलीवरि घेत तान,
सकलांचें हरित भान,
गोवत्सें त्यजुनि पान बघति हरिकडे ! २

खेळगडी घेउनियां,
नानापरि खेळुनियां,
गोधनासि चारुनियां ये गृहाकडे. ३

हरि आला भागुनियां,
कुरवाळी ह्मणुनि तया
जननी मुख चुंबुनियां घेतसे कडे. ४

गोपींचें चित्त हरत !
झाल्या त्या भानरहित !
गृहकृत्यां त्यजुनि बघत कान्हयाकडे ५

आलें मी तुजसि शरण,
चुकविं हरी ! जनन-मरण,
उघडुनियां कमल-नयन पाहिं मजकडे ! ६

[इ० स० १९१३.]

* खेळगडी मासिकांत ही कविता प्रसिद्ध झाली आहे.



आलें मी तुजसि शरण। चुकविं हरी जनन-मरण।
उघडुनियां कमलनयन पाहिं मजकडे॥ (पु. पृष्ठ ८ पहा.)

# अखेरची कविता.

[ कवयित्री निर्घृण काळाला बळी पडल्यामुळें ही कविता अपूर्णच राहिली आहे. कवयित्री ह्मणविणाऱ्या महाराष्ट्र-महिलांनीं ती पूर्ण करून आपल्या एका परलोकवासी भगिनीच्या आत्म्यास समाधान व शांती देण्याचें श्रेय घेतल्यास महदुपकार होणार आहेत. तरी तसें करण्यास सर्व महाराष्ट्र-कवयित्रींस मी अत्याग्रहाची व सविनय विनंती करीत आहें. ती त्यांजकडून मान्य होईल अशी आशा आहे—**माधव** ]

( माझें स्वप्न. )

( चाल-रे कुमुद-बांधवा ! नवल वाटतें० )

हेमंत ऋतूंतिल कोणे एके रजनीं,
मी व्यथित मनानें पडल होतें शयनीं,

हृदयांत ऊठती कितिक विचार-तरंग,
त्यामुळें जाहला मम निद्रेचा भंग !

कीं असें वांटतें व्यर्थ जिणें माझें हें !
हें शल्य सारखें हृदयीं टोंचित राहे.

ठेवावें वाटे नांव आपुलें मागें—
चिरकाल, मनीं हा ध्यास नित्य मज लागे

परि येति न मजला काव्यहार गुंफाया,
मग राहिल माझें नांव कसें जगतीं या ?

हा विचार येतां मन्मनिं न सुचे कांहीं,
जाहली मनाची पूर्ण निराशा तीही ! !

दु:खानें नयनीं वाहुं लागलें पाणी,
वरचेवरि मम हा येइ कंठ दाटोनी !

मी भाकुं लागलें करुणा वाग्देवीची–
" त्वां पूर्ण करावी आस देवि ! मन्मनिंची ! "

चिंतंत अशा या मिटति नेत्र माझे ते,
तों अकस्मात मीं देखियलें स्वप्नातेंः–

अपूर्ण. [इ० स० १९१४.]

* * * *

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८९.

REFBK-0001181
REFBK-0001181